म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २२५८

REFBK-0020249

श्रीयुत हरि कृष्ण पेंडसे यांस
सप्रेम भेट
पां. म. ओक

कां१०४
२२५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. १५०७८
विभाग ३.११
१९७
२१।७।५७

स्वस्तिक ग्रंथालय

मराठी ग्रंथ संग्रहालय
अ. क्र. २०२४९

# मधुबिन्दु

———*———

रचणार

महादेव पांडुरंग ओक
संस्कृत शिक्षक, पुणें.

स्वस्तिक वाचनालय,
चौपाडा - ठाणें

REFBK-0020249

इ. स. १९२७

किंमत दहा आणे.

प्रकाशक
महादेव पांडुरंग ओक
४७० शनिवार पेठ, पुणें.

( सर्व हक्क ग्रन्थकर्त्याचे स्वाधीन.)

मुद्रक
जी. के. गोखले
सेक्रेटरी 'श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स,'
४९५-४९६ शनिवार, पुणें.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| उपजाति | १–४० | तोटक | १६१ |
| शार्दूलविक्रीडित | ४१–५४ | प्रमिताक्षरा | १६२ |
| शालिनी | ५५–७० | वसन्ततिलका | १६३–१६७ |
| वतालीय | ७१–७५ | कामदा | १६८–१७१ |
| स्वागता | ७६–८४ | दिंडी | १७२–१९२ |
| द्रुतबिलंबित | ८५–९३ | साकी | १९३–२२९ |
| भुजंगप्रयात | ९४–१२४ | आर्या | २३०–४०० |
| इन्द्रवज्रा | १२५–१३८ | अनुष्टुप् | ४०१–५४९ |
| मालिनी | १३९–१४४ | अभंग | ५५०–५९३ |
| रथोद्धता | १४५–१५१ | ओंवी | ५९४–६३७ |
| पृथ्वी | १५२–१५९ | पद्य | ६३८–६९३ |
| औपच्छन्दासिक | १६० | गीतें वगैरे | ६९४–७३० |

काव्य २२५९

# गुरुवर्य प्रो. चिं. गं. भानु

## यांची

## प्रस्तावना.

पंडित माधवराव ओक महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या उत्तम परिचयाचे आहेत. यांचें संस्कृतभाषाप्रभुत्व आबालवृद्ध महाराष्ट्रीयांस म्हणजे मराठ्यांस समजलें आहे. संस्कृतासारखी अवघड भाषा मुलांस मनोहर रीतीनें शिकविण्याचें पंडित ओकांचें नैपुण्य पुण्यग्रामस्थ विद्यार्थ्यांस तर चांगलेंच ठाऊक झालें आहे. पंडित ओक यांची काव्यप्रतिभा वरिष्ठ प्रकारची, तेजस्वी, श्रवणमनोहर आहे, हें पंडित ओकांच्या **अभिनवरत्नमालेचे** दोन्ही सर व **सूक्तिसुधातरंगिणीचे** दोन्ही तरंग ज्यांनीं वाचिले आहेत, त्यांस पुनः सांगायाचें कारण नाहीं.

अशा आबालवृद्धपरिचित, अध्यापनचतुर, संस्कृत, मराठी, इंग्रजी इत्यादि भाषांचा सुदृढ व्यासंग करणाऱ्या तपस्वी पंडिताची व वाङ्मयप्रेमी वाचकांची गांठ पडावी एतदर्थ मध्यस्थाची आणि त्यांतही माझ्यासारख्या मध्यस्थाची मुळीं अपेक्षाच नसते व नसावी. परंतु हल्लींच्या काळीं रूढि मात्र पडत चालली आहे खरी. तीर्थाला गेलें असतां तीर्थोपाध्याय लागतो. वेदांत, योग वगैरे शास्त्रीय ग्रन्थांचें ज्ञान विज्ञान करून घेण्यास ' शास्त्रे परे च निष्णात ' गुरु अवश्य असतो. परमेश्वराचें आराधन ' ख्राइस्टला ' जामीन देऊनच ख्रिस्ती लोकांस करावें लागतें. असाच अभिनव प्रकार हल्लीं महाराष्ट्रांत सुरू झाला आहे. याच रूढीच्या प्राबल्याला मी बळी पडलों आणि म्हणून मला पंडित ओकांच्या ' मधुबिन्दु ' नामक मराठी अपत्यासंबंधें काय वाटतें, त्याचें अंशतः दिग्दर्शन करण्यास सज्ज झालों.

परकीय भाषांतील व विशेषतः इंग्लिश भाषेंतील सूक्तींचें सुभग भाषांतर संस्कृतासारख्या अभिजात भाषेंत पंडित ओक करितात, तसेंच आमच्या मराठी मायभाषेंतही करूं शकतात, हें पंडित मजकुरांस भूषणावह होय. शिवाय, परकीयांचे उदार विचार मराठी भाषेंत अवतीर्ण करून तिला अलंकृत करणें आणि मराठी बोलणाऱ्या आम्हांस अभिनव आणि अभिजात विचारांचें अमृत पाजणें हें माझ्या समजुतीनें एक अपूर्व कोजागरी व्रतच होय. आम्हीं पौरस्त्य 'निराशावादी,' असा डंका सर्वत्र गाजतो आहे. या डंक्याच्या रणगर्जनेंत सर्व सत्यच आहे असें नाहीं. तथापि तें खरेंच धरून मी म्हणतों कीं नैराश्याच्या निद्रेचा भंग करून आम्हांस ' प्रबुद्ध ' करणारा ओकशास्त्र्यांसारखा एखादा चतुर शिंगफुंक्या हवाच आहे. मी पंडित ओकांचें अभिनन्दन करतों, तें एवढ्याचसाठीं कीं पाश्चात्यांचीं सुभाषितें त्यांनीं संस्कृताच्या व मराठीच्या हळुवारपणाला यत्किंचितही धक्का न लावतां आपल्या भाषेंत आणिलीं

आणि त्यांतही पंडित मजकुरांची बहादुरी ही कीं त्यांनीं पाश्चात्यविचारांच्या बिंबांचा यथार्थ फोटो आम्हांस दिला आहे. परमेश्वराचे अवतार अंशात्मक असतात· परंतु कृष्णावतार जसा ' कृष्णस्तु भगवान् स्वयं ' आहे, तसाच पाश्चात्य विचारांचा पंडित ओक यांनीं केलेळा अवतार असलबरहुकुम आहे· आंग्लदेशस्थ ' बूटपाट-लेणीं ' वीराला मराठी शिलेदार करणें भारी कठिण· पण तेंही कठिण कार्य पंडित ओकांनीं ललितें केलें म्हणून मी म्हणतों ' अहो वैदग्ध्यम् ! ' इतकेंच नव्हे तर कोठें को॰ मराठी वाचकांस पचेल व पटेल असें जडावाचें लेणेंही पंडितांनीं मराठीकडून लेवविलें आहे.

असो, या मधुबिन्दूंत १७ धारा आहेत· अनेक मधुबिन्दु मिळून एक एक मधुधारा सिद्ध झाली आहे. बिन्दु म्हणजे एक गोड विचार· हे विचार अनेक अक्षरवृत्तांत व मात्रावृत्तांत प्रकट झाले आहेत. असे बिन्दु ७३० आहेत· या बिन्दूंत कोठें संस्कृत सुभाषितांची माधुरी, कोठें पाश्चात्य सूक्तींची श्रवणमनोहारिता, कोठें भगवान् बुद्धाची मनःसमाधानकारी शांतता आणि विरळ प्रसंगीं पंडित ओक यांची प्रतिभा-शाली काव्यप्रभुता वाङ्मयभक्तांस पदोपदीं आढळेल.

संस्कृतभाषा सर्वांगपरिपूर्ण आहे· तेव्हां तिच्या नातीनें म्हणजे मराठी भाषेनें आपल्या आजीचा कित्ता गिरवून पुष्कळशीं सुभाषितें आपणा स्वतःस अलंकृत करण्यासाठीं सिद्ध केलीं यांत नवल नाहीं· पंडित ओक यांचें अभिनन्दन करावयाचें तें एवढ्यासाठींच कीं त्यांनीं परदेशीकार लेणें आदरून आपल्या मायभाषेला सजविण्याचा अभिनव प्रयत्न केला आहे· प्रस्तुतच्या पुस्तकांत तर पुष्कळच पर-देशी अलंकार सर्वत्र विखुरले आहेतच· मी मात्र यांपैकीं दहापांच अलंकार उदाहर-णासाठीं घेऊन केवळ दीपकच नाहींत, पाचक व पोषक आहेत हें दाखविण्याचा प्रयत्न करणार आहें·

( १ ) पहिलाच मधुबिन्दु पहाः—

**अस्तास गेल्यावरि भास्कराची । न भा कधींही चमकावयाची ॥**
**धीमन्त तो मावळल्यावरीच । प्रभा पहा पाडिति तीव्र साच ॥**

इंग्रजी मूळः—

" Unlike the sun, intellectual luminaries shine brigitest after they set. " Colton.

जिवंत असतांना आपण प्रकट केलेल्या सत्याचें चीज झालें नाहीं तरी कालौघांत तें प्रमाण ठरेल, असा विश्वास बुद्धिवन्ताच्या अन्तःकरणांत उत्पन्न होतो व त्याची सत्याची तपश्चर्या सुरू राहते· तात्पर्य हा बहुमोली विचार समाजांत रूढ होतांच समाज पुष्टतेच्या मार्गास लागतो· भास्कराची ' भा ' आणि धीमंताची ' प्रभा ' ही पदयोजना मार्मिक असून मूळ वाक्याच्या खुमारीलाही खुलविते.

( २ ) छत्तिसावा बिन्दुः—

अपाय जो त्यास उपाय आहे। टाळावया मृत्यु उपाय नोहे॥

मूळः—

There is a remedy for everything but death.

Cervantes.

पंडितांनीं मुळांतील everything बद्दल ' अपाय ' शब्द उपयोजून मुळावरही बहार केली आहे नव्हे ?

( ३ ) पंचेचाळीसावा मधुबिन्दुः—

कोणाशीं बहुधा कुणी न घडवी मैत्री, स्वयें व्यक्त हो !

मूळः—

Friendships are discovered rather than made.

Mrs. Stowe.

व्यतिपजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतुः

भवभूतिः

( ४ ) पंचाहत्तरावा बिन्दुः—

अधिकार पदावरी जरी। शुनकातेंहि निवेशिलें तरी॥
गणिती नच ना कुणी जन। शिरसा वन्द्य तदीय शासन !॥

मूळः—A dog is obeyed is office Shakespeare

जुनें मराठी—" समर्था घरींचें श्वान। त्यास सर्वही देती मान॥ "

( ५ ) आणखी एक —

एका मारी त्या ' खुनी ' बोलताती। लाखों मारी ' वीर ' त्या लेखिताती॥

मूळः—

One murder made a villain, millions a hero.

Bp. Porteous.

खासा आहे नव्हे लोकरीतीचा गोंधळ !

( ६ ) Full many a flower is born to blush unseen.
And wastes its sweetness on the desert air. Gray.

या सुप्रसिद्ध पंक्तींचें भाषान्तर पहाः—

बिन्दु ७९ः—

हा ! कितीक कुसुमें विकसोनी। जाति निर्जनवनींच सुकोनी॥
लोकलोचनपथीं पडती ना। सौरभासहि कुणीच पुसे ना !॥

ग्रेची मुग्ध करुणा पंडितांच्या ' हा !' नें खाशी अनावृत केली नव्हे ?

( ७ ) People throw stones only at trees which have fruits on them.

भाषांतराची मौज तर पहा !

**फलभरें भरला तरु जोंवरी। दगड फेंकिति लोक तयावरी ॥**
**वसति अंगिं बहू गुण ज्याचिया। कटुवचें खल ताडिति ते तया ॥**

बिन्दु ८७.

मूळची अप्रस्तुत प्रशंसा प्रस्तुत झाली कीं?

( ८ ) **Fortune can take away riches, but not courage**

Seneca.

भाषांतरांतील खोंच पहाः—

**विधि कितीही असे जरि कोपला। मजवरी, परवा मुळिं ना मला ॥**
**धन हरील; हरो! करु ना दया!! क्षम न तो परि धैर्य हरावया ॥**

पारिस्थितीला डरावयाचें नाहीं, हा पाश्चात्यांचा स्वभाव आमच्यांतील एखाद्यांत मात्र अंकुरून विकसतो! रामशास्त्री प्रभुणे, बळवंतराव टिळक एखादाच! बाकीचे?

असाच एक ४९९ वा बिन्दु--

**भीरूच्या बसतो पाठीं, शूराच्या शोभतो करीं।**
**दैवनामक जो सोटा, तयाची भीति ना धरीं ॥**

( ९ ) A lie never lives to be old. Sophocles.

**अनृतनामक दुर्भग बालक। न च जगे बघण्या निजवार्द्धक ॥**

सत्यमेव जयते, नानृतम् ( मुंडकोपनिषद् ).

( १० ) **Toil on, faint not, keep watch and pray** Bonar.

बिन्दु ९६:—

**करा यत्न मोठा, धरा धीर चित्तीं। गमावूं नका संधि साधेल जी ती ॥**
**सदा ईश्वरातें स्तवा भक्तिभावें। फलप्राप्तितें आणखी काय व्हावें? ॥**

कसा पंडितांचा 'भुजंगप्रयात' वीरोत्साहपोषक आहे?

( ११ ) **Failures are with heroic minds stepping stones to success.**

**मनीं धीर विक्रान्त जे कां तयांतें। असिद्धीच कीं सिद्धिसोपान वाटे ॥**

बिन्दु १२३.

म्हणा 'जय जय रघुवीर समर्थ!!'

**विपत्ती सोसणें हेंचि वाटे दैवास जिंकिणें!** बिन्दु ५२२.

( १२ ) God gives birds their food, but they must fly for it.

Dutch Proverb.

भाषांतरः—

**खाद्य खगांचें विधिनें निर्मियलें परि न जवळ ठेवियलें।**
**तत्प्राप्तीस्तव त्यांहीं आकाशीं नित्य पाहिजे उडलें! ॥**

बिन्दु २७२.

नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।

व्या विचार सादृश्य ! कोठें हॉलंड व कोठें हिंदुस्थान ! बाकी ' असेल माझा हरि तरि देइल खाटल्यावरी ' असें म्हणणारे अविश्वासी हरिभक्त किती तरी ?

( १३ ) Work is not man's punishment; it is his reward and his strength, his glory and his pleasure. George Sand,

भाषांतर—

**ब्रह्मानें कर्म जगीं दंडाया निर्मिलें न मनुजास ।**
**फलद असे, बलद असे, सुखद असें हें यशोदचि तयास ॥**

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः भगवद्गीता.

हा उपदेश आम्हां व्यावहारिकांस केव्हां पटेल व उमटेल ?

( १४ ) ' The *Blackest* of fluids is used as an agent to *enlighten* the world. ' D. Jerold.

भाषांतर—

**कालाकुट्ट असा एक विधिनें द्रव निर्मिला ।**
**उद्भासित कराया जो जगा साधन जाहला ॥**

( द्रव = शाई ) बिन्दु ४३२

मुळांत व भाषांतरांत विरोधाभास सारखाच चमकतो; नव्हे ?

( १५ ) Idleness is many gathered miseries in one name. Richter.

भाषांतर बिन्दु ५९५—

**अनर्थ बहुत एकवटले । त्यांसी एकचि नाम दिलें ॥**
**निवडोनियां सुजनीं भलें । ' आळस ' ऐसें ॥**

हा सुजनांचा ' नामकरणविधि ' आम्हांस केव्हां निरलस करलि ?

( १६ ) The universe is the realized thought of God. Carlyle.

भाषान्तर बिन्दु ५२५

**व्यक्तरूपा विधात्याच्या संकल्पा विश्व जाणिजे ।**

सोऽचिन्तयत् ' बहु स्यां प्रजायेय ' हें उपनिषद्वाक्य ! असो; असे किती किती तरी स्वादिष्ट मधुबिन्दु " आम्हांस घ्या, आम्हांस घ्या " म्हणून आर्जवें करीत आहेत, काय सांगावें ? नौकरी मागणाऱ्या ब्राह्मण, ब्राह्मणेतरांची गर्दीच काय पण श्रीपंढरीच्या विठ्ठल भक्तांची ही गर्दी सोसवेल, पण या अमृततुल्य अभिनव मधुधारांचा लोंढा कालस्थलांच्या अभावामुळें मला असह्य झाला; म्हणून येथें भाषांतरी भागासंबंधीं मोह एकीकडे सारतों आणि पंडित ओकांच्या स्वकृत पद्यांतील एकदोन पद्यांचा मात्र उदाहरणार्थ उल्लेख करतों.

( १ ) ६९७ वा मधुबिन्दु सर्पविषयक आहे ! येथें सर्पविषाची भीति नाहीं, त्याचें स्वभावगुणवर्णन आहे. " हे मना । सोड कल्पना " ह्या बहारीच्या चालीवर

हें पद्य आहे. ह्या पद्यांत कविकल्पना चांगलीच प्रकट झाली आहे. गर्वानें फुगून बेडूक गिळणारा, पवनभुक् ( वायुसेवन करणारा ) असून निरपराध्यांस मारणारा, चंदनावर बसून जनांस घाबरविणारा, दुबळ्याचें बीळ हिरावून घेऊन नकुळाला भिणारा, कुटिल, दुतोंड्या (दोन जिभांचा) दुध पाजणाराला डसणारा, हा सर्प म्हणजे कलीचा अवतारच! पद्य सुरेख आहे.

( २ ) 'घट' सामान्य विषय ना? पण घटावरील पद्यांत (बिन्दु ६९८) कवीचें निरीक्षण, त्याची कल्पना, भाषाप्रभुत्व इत्यादि गुण प्रफुल्लित झाले आहेत. जितका सर्प दुष्ट, त्याच्या शंभरपट हा आमचा घट सुष्ट आहे. गळ्यास फास घालून विहिरींत लोटणारांसच 'जीवन' देऊन संतुष्ट करणारा, नीरसांस रसज्ञ करणारा, ललनांच्या करीं, शिरीं, कडेवर बसून खेळणारा, मंगल कार्याला साह्य करणारा, मृतासह गमन करणारा, आणि अगस्तीसारख्या प्रतापी पुत्राला ( यानेंच सागराचें "एक्या आचमनें" प्राशन केलें! ) जन्म देणारा घट कोणाला प्रिय होणार नाहीं? तार्किक व वेदान्ती नीरस ना? पण त्यांचें सुद्धां घटाशिवाय चालत नाहीं. असो; हें काव्य मला फार आवडलें.

( ३ ) आम्ही सध्यांच्या हिन्दु झालेल्या आर्यांनीं 'प्रबोधन' अवश्य वाचावें. हें पद्य उत्तमोत्तम अंजन आहे, डोळे साफ बरे करील, दूरचें पाहण्याला शिकवील. माझ्या समजुतीनें शेवटचे एक दोन वळसे जलाल आहेत, 'स्वत्व न सोडतां, स्वत्वाला पोषक ग्राह्यग्राह्य स्वीकारणें' हा माझा पंथ आहे. असो.

मागें मीं म्हटलेंच आहे कीं या मधुबिंदुधारांत पाश्चात्य मध पुष्कळसा सांठविला आहे. शेक्सपियर, मिल्टन, काऊपर, टेनिसन, जॉनसन, गोल्ड्स्मिथ, व्हाल्टेर, रूसो, प्लेटो, सॉक्रेटिस, शेले, शेरिडन, सिसरो, डिमास्थेनीस, जीजस ख्राइस्ट, मिसेस-स्टो प्रभृति अनेक कवींच्या, तत्त्वज्ञांच्या, ग्लॅडस्टन, डिस्त्रायली प्रभृति मुत्सद्यांच्या सूक्तींचा मध प्रस्तुतच्या पुस्तकांत सांठवून एक सुंदर पोळें महाराष्ट्रवाचकांच्या हातांत पंडित ओक या मधुकरानें दिलें आहे. त्याचा सादर स्वीकार केला असतां कांहीं बिंदु महाराष्ट्री विचारांचें समर्थन करतील, कांहीं बिंदू अर्थसादृश्य पटवून देतील, कांहीं वाचकांस नवी दृष्टि देतील, कांहीं व्यवहार शिकवितील, कांहीं मधुबिंदु ऋग्वेदकालीन आर्यांचा उत्साह, तरतरी, आनंदी स्वभाव, उद्योगप्रियता समाज-कल्याण, स्वाभिमान, राष्ट्राभिमान आमच्या महाराष्ट्रांत पुनः प्रतिष्ठापित करतील. तात्पर्य शिष्ट बहुश्रुतता प्राप्त करून देण्याला प्रस्तुतचें पुस्तक चांगलें साह्यकारी होईल. तरुण विद्यार्थ्यांस तर असल्या पुस्तकाचा फारच उपयोग होईल. निबंध लिहितांना, डिबेटिंग क्लबांत बोलतांना आपलीं मतें पुष्ट करून भारदस्तपणा देण्यास हें पंडित ओकांचें पुस्तक अत्यंत उपयोगी होईल. 'शिकण्यासाठीं जगा, जगण्यासाठीं शिकूं नका' 'मेल्यानंतरही नांव टिकेल अशी करणी करा' व्यायाम करा,

मित आहार ठेवा, प्रत्येक क्षणाचा उपयोग करा, मायभूमीची काळजी बाळगा, जन्मदातीं मातापितरें, गुरु, ज्ञानवृद्ध, सभ्य गृहस्थ, साधुसंत, परमेश्वर यांची एकनिष्ठ सेवा करून कृतज्ञता दाखवा इत्यादि इत्यादि उपदेशामृताचे घुटके आमच्या तरुण, तरतरीत, आनंदी, हौसी पिढीनें घेतले, तर राष्ट्राचें दैन्य जाईल, संपत्ति वाढेल, स्वतंत्रता मिळेल. फार काय सांगावें? प्राचीन ग्रीक सारस्वताचा अभ्यास केला म्हणून आधुनिक युरोप जागृत झालें, तसाच आमचा हा महाराष्ट्र देश पांच चारशें वर्षांचे कुंभकर्णी झोपेंचें घुंगट टाकून देऊन पुनः ताजातवाना होण्याला जीं काय शिष्टसंमत साधनें आहेत, त्यांत हें अभिनव मधुबिंदूंचें ग्रहण हें सोपें साधन आहे. यांकडे आईबापांचें, शालाचालकांचें, सरकारचें लक्ष वेधून त्यांच्या प्रेरणेनें 'मधुबिंदुसारखीं' पुस्तकें नित्यपाठास द्यावीं, अशी माझी सूचना आहे.

माझी प्रस्तावना बहुतेक संपली. शेवटीं इतकेंच सांगावयाचें. संस्कृतसारख्या देववाणींत जशी पंडित माधवरावांची अकुण्ठित गति आहे, तशीच आमच्या बिचाऱ्या मराठी भाषेंतही आहे, ह्याचें मला फार कौतुक वाटतें. कोणत्याही परकी विचाराला मराठी पेहेराव चढवून त्याला 'शुद्ध मराठा' करण्याचें ओकशास्त्र्यांचें कौशल्य कौतुकास्पद आहे. कितीतरी ह्या 'मधुबिन्दूंतील' पद्यें आपलीं कीं परकीं असा संशय कोणत्याही खंद्या विष्णु शास्त्री चिपळूणकरांच्याही मनांत उत्पन्न करणारीं आहेत. या पंडित ओकांची भाषा प्रायः साधी, गोड, शुद्ध, औचित्यपूर्ण आहे. यांच्या पद्यांत शब्दालंकार व अर्थालंकार झळकतात. मात्र हें मानापमानांतील 'लक्ष्मीधरांच्या' अलंकारांसारखे शिरजोर नाहींत. अलंकारांसाठीं काव्य नसतें, हे पंडित महसुफांस पूर्ण अवगत आहे. मधुबिन्दूंत आलेल्या पद्यांशिवाय पंडितांचीं दुसरीं कांहीं अनेक पद्यात्मक काव्यें मीं पाहिलीं त्यांवरून मला म्हणतां येतें कीं शिष्टसंमत शृंगार, उत्साही वीर, हृदयस्पर्शी करुण, सभ्य हास्य इत्यादि रसांचा उचित परिपोष करण्याचेंही सामर्थ्य या कवींस आहे. परमेश्वर करो आणि पंडित ओककवींस 'मराठे शाहीवर' एखादें ऐतिहासिक काव्य करण्याची स्फूर्ति होवो; अथवा मेघदूतासारखे कल्पनाप्रचुर काव्य करण्याची स्फूर्ति होवो!

शेवटीं मधुबिन्दूंसह 'अभिनवरत्नमाला' सर दोन व 'सूक्तिसुधातरंगिणा' तरंग दोन हीं पुस्तकें वाचण्यासाठीं बक्षीस दिलीं आणि कांहीं कालपर्यंत काव्यामृताचें प्राशन करण्याची संधि दिली, या प्रीत्यर्थ पंडित माधवरावजी ओक यांचे आभार मानतों आणि आशा बाळगतों कीं आमच्या मराठी बालगोपालांच्या अन्तःकरण्यांत उद्योग, सदुद्योग, राष्ट्रहितकर सदुद्योग निरलसपणें करण्याची प्रेरणा, 'इष्टालाभे लब्धमिष्टं' मध्यें समाधान, सात्त्विक सुस्वभावाची आवड, परमेश्वराची शुद्ध भक्ति इत्यादि सद्विकारांची बीजें तरी पंडित ओकांच्या काव्यांनीं उत्पन्न होवोत!

# आत्मनिवेदन.

१. वेळोवेळीं, वेळांत वेळ काढून, करमणुकीसाठीं म्हणून सहज झालेल्या कविता या पूर्वीही मी प्रसिद्ध केल्या आहेत. हल्लींच्या दिवसांत प्रकट होणारी कविता आणि माझीं कवनें यांमध्यें दिसून येणारें भाषेचें वेगळें वळण या संबंधीं थोडासा खुलासा करणें मराठी भाषेमध्यें रचना करणाऱ्या होतकरू लेखकवर्गाच्या दृष्टीनें फायद्याचें होईल अशा समजुतीनें मी त्यासंबंधीं चार शब्द लिहितों.

शिवलीलामृत, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप वगैरे अभियुक्त परंतु प्रेमळ आणि आबालसुबोध ग्रंथांची आपल्या स्त्रीनातेवाईक मंडळींस वाचून दाखविण्याच्या मिषानें पारायणें माझ्याकडून लहानपणींच अनेकदां झाल्यामुळें मला मराठी भाषेंत कविता करणें अत्यंत सुलभ झालें. वाचलेल्या ओंवीबद्ध ग्रंथांतील ओंव्यांचा निरानिराळ्या वृत्तांत अनुवाद करण्याचा मला छंदच लागला होता. कधींकधीं तर आख्यानेंच्या आख्यानेंच मी रचावीं ! एकच विषय अनेकदा अनेक वृत्तांत वर्णन करण्याच्या या नादामुळें भाषेंतील समानार्थक किंवा पर्यायभूत शब्द यांचा भरणा जिव्हाग्रीं नेहमीं तयार राहूं लागला. संक्षेप, विस्तार, विकास वगैरे ग्रथनविद्येंतील अनेक अंगोपांगाचा आचारपूर्वक अभ्यास अशा रीतीनें सहज झाल्यामुळेंच प्रस्तुत "मधुबिंदु"सारखें पुस्तक माझ्या हातून होऊं शकलें. स्नेही मंडळींचा आग्रह न पडता तर भाषांतर, रूपांतर, छंदांतर, वगैरे जवळ जवळ न कळत अहर्निश घडणाऱ्या माझ्या वाग्व्यापारास पुस्तकाचें गंभीर स्वरूप कधींच प्राप्त झालें नसतें ! शिंपी जसा मुद्दाम कापडाची चीरफाड न करतां आळींतील मुलांना चिंध्यांचे चेंडू मौजेखातर तयार करून देतो तसाच मीही या पुस्तकाच्या द्वारें माझ्या खेळाडू बालगोपालांस कोणत्याही एका विशिष्ट विषयवस्त्राची तोडजोड न करतां माझ्या कारखान्यांत सहज जमलेल्या विचारचिंध्यांचे मधुबिंदुकंदुक बनवून देत आहें. या करमणुकीच्या प्रकाराचा प्रसार माझ्या बालगोपालांत थोडाबहुत आजही होत आहे, तोच अधिकाधिक झाल्यास मराठी भाषेंत अनेक उपयुक्त विचारांची सहजा-

सहजीं भर पडेल. आणखी केवळ मनोरंजनार्थ ग्रंथरचना होऊं लागली म्हणजे अनायासानेंच तुटपुंज्या लेखकांत सरसहा दिसून येणारा ग्रंथकर्तृत्वाचा फुंज नाहींसा होईल. वाङ्मयाची निर्दंभसेवा करणें किती उन्नतिप्रद आहे याचें काय विवरण करावयास पाहिजे ? कर्तव्यच करमणूक वाटूं लागणें ही जीवन्मुक्ति आणि हीच पराकाष्ठा आणि हीच परा गति !

२. संस्कृत भाषेच्या अध्यापकाचें काम करीत असतां प्रवाहपतित अशा वाक्यरचनाध्यापनासाठीं म्हणून विविध ग्रंथांतून नित्य नूतन उतारे काढून त्यांचें भाषांतर विद्यार्थ्यांस पढविण्याचा उपक्रम सुरू केला. ठराविक सुभाषितें ठराविक कोटिक्रम करून ठराविक ठशांत वर्षानुवर्षे मुलांच्या कानांत ओतीत बसण्याचा स्वभावतःच वीट आणि बाळपणापासून कथाकीर्तनें ऐकल्यामुळें प्रसिद्ध सुभाषितांविषयीं अतिपरिचयामुळें अवज्ञाबुद्धि आणि अध्यापनाच्या आणि विवरणाच्या दृष्टीनें अनावड उत्पन्न झाल्यामुळें परकीय वाङ्मयांतून इतस्ततः विखुरलेलीं अनंत सुभाषितें गोळा करून त्यांना संस्कृत भाषेची मी धर्मदीक्षा देऊं लागलों. अशा रीतीनें रशियन, ग्रीक, लॅटिन, इटालियन, स्पॅनिश, जर्मन, डच, इंग्लिश वगैरे भाषांतील विचारांना वाक्पावन करून आप्तस्वकीय विचारांशीं त्यांचा व्यवहारसंबंध जुळवून दिला. चार पाठावल्या, अभिनवरत्नमालेचे दोन सर, सूक्तिसुधातरंगिणीचे दोन तरंग अशा आठ वसाहती करून पाश्चात्य आणि पौरस्त्य यामध्यें फार जुनाट काळापासून असलेला स्पर्शास्पर्शाचा मोठा बिकट प्रश्न मी आपल्या अल्प सामर्थ्यानुसार सोडवून दाखविला. शारीरिक स्पर्शास्पर्शासंबंधीं यथेष्टाचारास प्रोत्साहन देणारे कित्येक संस्कृत पंडित या भाषास्पर्शास्पर्शाविषयीं किती संकोचित दृष्टीचे असतात याचा मला चांगलाच अनुभव आला. जुन्या परमहंससभेसारखें गुप्त कारस्थान न करतां उघड पंक्तिव्यवहाराचा पुरस्कार केल्यामुळें वर्णसंकरापासून उत्पन्न होणाऱ्या आपत्ति आपल्या आर्यसंस्कृत भाषेवर येऊन कोसळतील या भीतीनें गांगरून जाऊन माझ्या या नवीन पुस्तकांपासून फटकून रहाण्याचा किती काळपर्यंत तरी भाषाशिक्षकांनीं अट्टहास केला. तथापि ही त्यांची भीति अगदीं निराधार होती असें कालांतरानें त्यांस आढळून आलें व मग त्यांपैकीं जे स्वभावतः ऋजु आणि निर्मत्सर होते त्यांनीं या नवोपक्रमाबद्दल पूर्ण पसंती दर्शविली. रूढ संप्रदायास यत्किंचितही धक्का पोंचूं न

देतां पृथ्वीवरील यच्चयावत् भाषांतील यच्चयावत् विचार संस्कृतांत यथास्थित-पणें व्यक्त करणें शक्य आहे असें मी स्वानुभवानें सांगूं शकतों. बाकी आतां माझ्या मताचे पुष्कळ विद्वान् झाल्यामुळें या बाजूनें मला श्रम करण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. संस्कृत भाषेच्या वाढीसाठीं या विद्वानांनींही प्रयत्न करावे अशी त्यांस माझी विनंति आहे. पाश्चात्य भाषांतून इंग्रजींत आणि इंग्रजींतून संस्कृतांत पाश्चात्यांचे अनुभव आणून त्यांस आतां "मधुबिंदू" च्या द्वारें मी महाराष्ट्रीयांच्या मायभाषेंत आणून सोडिलें आहे. यापुढें हरदास, कीर्तनकार, यांना इंग्रजी सुभाषितांचा सुखानें उपयोग करितां येईल. अनुभवाचा प्रांत विश्वाएवढा व्यापक असतांना त्याला संकोचित करण्याचें धोरण त्यांनीं सोडून दिलें पाहिजे आणि आजकालच्या समंजस हरिदासांकडे पाहतां ते तें धोरण सोडून देतील असा भरंवसा वाटतो.

३. परभाषेंतील सबंधच्या सबंध ग्रंथांचें भाषांतर करण्यापेक्षां त्यांतील वेंचक भागांचें भाषांतर करण्यांत आणखी एक फायदा आहे. तो असा कीं, चारदोन, चारदोन, वाक्यांचेंच भाषांतर करावयाचें असल्यामुळें भाषांतरकारास तें रेखीव, बिनचूक, रहस्योद्ग्राही, मधुर आणि मनोहर करणें सुकर होतें. परभाषेंतील रचनाविशेषाचा भाषांतरास वासही लागूं न देणें फार कठिण कर्म आहे. एवढ्याकरितां फुरसत आणि आवड असलेल्या भाषाभिज्ञांनीं विश्रांतीच्या वेळीं अशा प्रकारचा उपक्रम केल्यास मधुबिंदूंचा मधुसागर सांचण्यास फार वेळ लागणार नाहीं. विशेषतः प्रदीर्घ रचना करण्यास लागणारी अनुकूलता ज्यांना नसेल त्या माझ्यासारख्या इतर व्यवसायबंधूंनीं या मुद्याकडे लक्ष द्यावें.

४. मला स्वतः मराठींत मोठालीं काव्यें लिहिण्यास सवडच नाहीं. अध्यापनाचें कार्य यथासांग पार पाडतांना भलत्याच भाषाभिमानाच्या भरीं भरून सुभाषित पार्थिवांचें ओबडधोबड आणि बोजड कोटिलिंगार्चन करण्याचा उपहासास्पद प्रयत्न करण्यांत मतलब काय ? निदान मी तरी त्या फंदांत पडणार नाहीं हें खास !

५. "मधुबिंदूंतील" सुभाषितें ज्या मूळ इंग्रजी सुभाषितांचीं भाषांतरें आहेत तीं इंग्रजी सुभाषितें "अभिनवरत्नमाला" किंवा "सूक्तिसुधातरंगिणी" प्रमाणें या पुस्तकांत छापिलीं नाहींत. एक तर निवळ मराठी जाणणाऱ्या वाच-

कांस त्यांचा उपयोग नाहीं. आणि दुसरें तीं माझ्या उपर्युक्त पुस्तकांत दिलीं असल्यामुळें जिज्ञासूंस तीं त्या पुस्तकांत सहज पहावयास मिळतील. किंबहुना आवड आणि सवड असलेल्यांनीं मूळ इंग्रजी, त्याचें संस्कृत भाषांतर आणि त्याचें मराठी भाषांतर ताडून पहावें म्हणूनच इंग्रजी सुभाषितें या पुस्तकांत छापिलीं नाहींत असें म्हटलें तरी चालेल. अल्पसंख्याक जिज्ञासूंसाठीं सर्व-सामान्य मराठी वाचकांवर छपाईच्या खर्चाचा बोजा टाकणें अन्यायाचेंच झालें असतें. आणि शेवटीं इंग्रजी सुभाषितांचा संस्कृत अवतार मान्य झाल्यावर आतां त्यांची मराठीबरोबर पुन्हां मिरवणूक काढून मी स्वतःच्या शिणभागांत भर टाकण्याचें कारणही नाहीं.

६. या मधुबिंदूंचा मराठी वाचकवर्गानें यथायोग्य परामर्श घेतल्याचें आढळून आल्यास असलीं आणखीही पुस्तकें प्रकाशित करण्यास माझी तयारी आहे हें मराठी वाचकांस मी प्रेमपूर्वक कळवून ठेवितों.

७. सहज रस्त्यांत गांठ पडली असतां ज्यांनीं जुनी ओळख म्हणून कुशल प्रश्न विचारले व ज्यांस प्रस्तुत पुस्तक चालू उद्योग म्हणून दाखविलें असतां ज्यांनीं प्रस्तुत पुस्तक समग्र काळजीपूर्वक वाचून पाहून आरंभीं जोडलेली गुणोत्कर्षदर्शक प्रस्तावना लिहून दिली त्या गुरुवर्य **प्रो. चिं. गं. भानूंचे** त्यांची तशी यत्किंचित् अपेक्षा नसतांही सदाचारप्राप्तकर्तव्य म्हणून आभार मानतों.

धनत्रयोदशी, <br>
२३ ऑक्टोबर १९२७

सर्वांचा कृपाभिलाषी <br>
**म. पां. ओक.**

# शुद्धिपत्र

—✱—

| पृष्ठ | बिन्दु | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३७ | २५४ | उन्नन | उन्नत |
| ३९ | २७२ | निर्नियलें | निर्मियलें |
| ४५ | ३२९ | वचना | वचन |
| ५० | ३६३ | दवन | वद्न |
| ५९ | ४४१ | मक्षिका त्रास | मक्षिकात्रास |
| ६० | ४५३ | त्यां | त्या |
| ९५ | ६९८ | पयात | पयातें |
| ९६ | ६९९ | स्पष्ठार्थ | स्पष्टार्थ |

२०२४९ ३-८

# मधुबिन्दु

## प्रथमधारा

### उपजाति

——:o:——

-१-

अस्तास गेल्यावरि भास्कराची । न भा कधींही चमकावयाची ॥
धीमन्त तों मावळल्यावरीच । प्रभा पहा पाडिति तीव्र साच ॥

-२-

आनन्दरूपा पिउनी रसातें । येवो मुळीं ना मद आपणातें ॥
कधीं कधीं वैद्य हरी म्हणून । शोकौषधाचें करवीत पान ॥

-३-

आयुष्य अत्यल्प असे नराचें । अनल्प ते कोड परी मनींचे ॥
ज्यांतील एका पुरवावयास । यत्नें कुणीही न शकेल खास ॥

-४-

उदारधीतें जरि दैन्य येई । औदार्य त्याचें न च लुप्त होई ॥
दीना कदर्या धन लाभल्याही हा हा तयाचें स्थिर दैन्य राही ॥

-५-

करोनियां यत्न बहूत धीस । नेवूं शके मानव वश्यतेस ॥
प्रसिद्ध जे का प्रतिभा म्हणून । तिला कराया वश शक्त कोण ? ॥

-६-

गुलाब ऐसें वदती जयाला । दिलें दुजें नांव जरी तयाला ॥
सुगंध त्याचा तरि हो न हीन । वस्तूस, नामा न जगांत मान ॥

-७-

ग्रन्थ स्तवी जो स्वमुखें स्वताचे । त्याचें हसें खासाचि व्हावयाचें ॥
"माझा बब्या सर्व जगीं शहाणा"। माता म्हणे, हेंहि असेंचि जाणा ॥

-८-

चलत्व येणें सकलां नगांना । कालान्तरें शक्य घडेल माना ।
स्वभाव जो काय असे जयाचा । कधींहि ना तो बदले तयाचा ॥

-९-

जगीं प्रतिष्ठा मिळवावयाचे । आहेत कीं दोनचि मार्ग साचे ॥
उद्योगिता एक सदा स्वताची । तैसा दुजा, दुर्बलता पराची ॥

-१०-

जसे जसे प्रौढदशेस जाऊं । तसे तसे प्रीत विशेष होऊं ॥
जेणें तयालाचि गुणें वरेण्य । ग्रन्था गणावें, इतरांस हीन ॥

-११-

तयार जे आपण जावयास । नेता तयांचा विधि होय खास ॥
ज्यांची खुशी ना परि जावयाला । बळेंचि ने खेंचुनि तो तयांला ॥

-१२-

त्या त्या गुणांहीं अपुल्या परांचा । समर्थ कोणी प्रभु होय साचा ॥
परी तयांच्या हृदयास घ्याया । दिल्याविना कोण शके स्वकीया? ॥

-१३-

दया नितान्ताभिमता खलांना । उदारता लोभसमाकुलांना ॥
विनम्रता दृप्त जनां, परांच्या । चित्तीं जरी ह्या स्थित व्हावयाच्या ॥

-१४-

दरिद्रते देवि तुझ्या कृपेनें । मी पावलों अद्भुत सिद्धि जाणें ॥
कीं पाहतों मी सकलां जनांतें । पाही जगीं या कुणिही न मातें ॥

-१५-

दानार्थ भोगार्थ असेल वित्त । तरीच संसार गमे पसंत ॥
पोटार्थ ज्या भीकचि मागण्याची । पाळी,तया आवड केंवि त्याची?॥

-१६-

दिवंगतांचे कुणि जे जिवंत । आप्तेष्ट त्यांतें जपणें नितान्त ॥
हा मार्ग वाटे मज एक साचा । मार्ग मृतांच्या अनुशोचनाचा ॥

-१७-

न कांचनाचा अभिलाष मातें । संमान तो मात्र रुचे मनातें ॥
मानाभिलाषा जरि पाप मानां । पापी न माझ्यासम अन्य जाणा ॥

-१८-

निर्दोष ऐसा नर एकही न । मिळूं शके या जगतीं, म्हणून ॥
थोडेच कीं दोष जया नरांत । गुणाढ्य त्यालाच गणा मनांत ॥

-१९-

निवर्तले संत तयां स्तवावें । जिवंत जे त्यांस परी छळावें ॥
हा हा जगीं ही विपरीत रीती । प्रायः कसे हो जन आदरीती ॥

-२०-

पुनः पुनः जीं मनिं चिन्तिल्यानें । आनन्द देती विविधा परीनें ॥
भोगें जयांचा रस हो न हीन । क्षणोक्षणीं जीं गमती नवीन ॥
ऐशीं सुखें सर्वहि, जीं मनींचीं; । यांहूनि न्यारीं असती तनूचीं ॥

-२१-

भाव्यर्थचिन्ता करि जो नितान्त । दुःखी दुजा तत्सम ना जगांत ॥
न अल्पही जो करि तत्समान । वाटे कुणी मूर्ख शिरोमणी न ॥

-२२-

भासे कथाचीहि न वाण ज्यास । श्रीमंत अत्यन्त गणा तयास ॥
सोडी धनाची न च हाव भारी । धनीहि तो सत्य सदा भिकारी ॥

-२३-

वेश्येपरी केवल भोग देते । दासीपरी वा करि चाकरीतें ॥
विद्या नको ती, प्रसवा सुखास । जी हेतु पत्नीपरि सेवुं तीस ॥

-२४-

मदर्थ सारें जग निर्मियेलें । कोणाहि साठीं मजला न केलें ॥
जणू अशी धी धरुनी मनांत । लोभी सदा वागतसे जगांत ॥

-२५-

मैत्री विधीनें जगिं निर्मियेली । ती मानवांना मग अर्पियेली ॥
साहाय्यदानासचि सद्गुणांच्या । अनुग्रहातें न च दुर्गुणांच्या ॥

-२६-

लक्ष्याप्रती जे न च पोंचतातीं । जे लंघुनी वा पुढतींच जाती ॥
धनुर्धरांचे शर चापमुक्त । सारेचि ते निष्फल तुल्य होत ॥

-२७-

श्रीमंत जे त्यां परवेदनांची । जाणीव कांहीं नसतेच साची ॥
शेषाचिया मस्तकिं भार भूचा । तरी करी श्रीपति तल्प त्याचा ॥

-२८-

संसारमार्गीं बहु धन्य तोचि । दशा स्वभावानुगुणा जयाची ॥
दशानुरोधें फिरवी स्वभावा । तयाहुनी तो सुकृती गणावा ॥

-२९-

सत्कर्म हातीं घडलें न कांहीं । चित्तीं उदेला सुविचार नाहीं ॥
अशापरी घालवुनी दिनाला । सेवी सुखें कोण निशीं निजेला ? ॥

-३०-

सत्यत्व ज्याचें पटलें मनाला। तें वाणिनें ना म्हणणें कशाला ?॥
मनास जें का पटलेंच नाहीं। तें हो म्हणोनी न च लाभ कांहीं ॥

-३१-

सद्वैद्य साधी जितुकें व्रणांच्या। विरोपणानें हित सैनिकांच्या ॥
सेनाशतेंही हित मानवांचें। साधावयाचें तितुकें न साचें ॥

-३२-

सन्मित्र येताति निमंत्रिल्यास। संपत्प्रसंगीं सुख भोगण्यास ॥
निमंत्रिल्यावांचुनियांच येती। विपत्प्रसंगीं समदुःख होती ॥

-३३-

सुपीकही शेत कसें पिकेल। धनी न त्यांतें जरि नांगरील ? ॥
संस्कार केल्याविण शिक्षणाचा। धीपासुनी लाभ न हो फलाचा॥

-३४-

स्वपाद पंगूप्रति देउनीयां। डोळे तयापासुनि घेउनीयां ॥
कीं डोळसाच्या परि आंधळाही। खांद्यावरी साच तयास वाही॥

-३५-

स्वर्गांतुनी निर्मळ जीं गळालीं। सजीव रत्नें बहुमूल्य खालीं॥
संज्ञा मुलें ही खुलते जयांस। देखोनियां कोण भुले न त्यांस ? ॥

-३६-

अपाय जो त्यास उपाय आहे। टाळावया मृत्यु उपाय नोहे ॥

-३७-

जिवंत जे का प्रिय ते गणावे। स्वर्गस्थही सर्वचि आदरावे ॥

-३८-

दिवंगतांचे जगिं सत्कवींचे । सद्ग्रन्थ कीर्तिध्वज जाण साचे ॥

-३९-

विचारवंतीं करुनी विचार । जें बोलिजे वाङ्मय तेंचि सार ॥

-४०-

जयां मनीं नित्यचि मृत्युभीति । ते दीर्घजीवी बहुधा न होती ॥

# द्वितीयधारा

## शार्दूलविक्रीडित

-४१-

ऐसें काय लिखाण हो लिहुं तरी जें योग्य छापावया ? ।
यत्नें जें लिहिलें प्रकाशक कुणी छापील कां हो तया ? ॥
ज्ञाते वाचकं लाधणें कुठुनि तें वाचावया कारणें ? ।
हें तापत्रय सर्वही कविगणा प्रायः पडे भोगणें ॥

-४२-

जाळी अर्जुन खांडवाख्य विपिना दिव्यद्रुमीं जें युत ।
जाळी वायुतनूज रावणपुरी लंका सुवर्णांकित ॥
जाळी शंकर पुष्पसायकतनू हें ही न झालें भलें ।
दारिद्र्या जनतापदा न च कुणी अद्यापि कां जाळिलें ? ॥

-४३-

' मी माझाचि असें ' असें समजणें चित्तीं चुकीचें असे ।
आहे जो अपुलाचि केवळ असा येथें कुणीही नसे ॥
पोसाया निजदारपुत्रदुहिता इत्यादिकांतें अहा ।
जो तो जन्मभरी परिश्रम करी नानाप्रकारें पहा ॥ १ ॥

कोणातें स्तवितो, कुणा रमवितो, कोणाप्रती सेवितो ।
कोणा तोषवितो कुणास भजतो ऐशापरी वागतो ॥
कीं वाटे जनता जनार्दनचि हे झाली स्वयें आपण ।
झाला मानव भक्त नित्य करितो प्रेमें तदाराधन ॥ २ ॥

-४४-

हें आहे मजला म्हणोनि मनिं जो आनंद मानी सदा ।
हें नाहीं म्हणुनी सशोक अपुल्या चित्ता करी ना कदा ॥
तो विद्वान् मतिमान् कृतज्ञ जगतीं सर्वा गुणांचा निधि ।
संसारांतिल सार त्यास कळलें सारे दुजे मन्दधी ॥

-४५-

कोणाशीं बहुधा कुणी न घडवी मैत्री, स्वयें व्यक्त हो ।

-४६-

खोटें बोलति ते, दुजे न कधिंही, भीरु स्वभावेंचि जे ;

-४७-

गद्याहूनि मनास पद्य रिझवी बह्वर्थ अल्पाक्षर ।

-४८-

गेला सोडुनि जो जगा जगिं अशा राहे कुणाची स्मृती ?।

-४९-

चक्षू वस्तु समस्त अन्य बघतो देखे स्वताला न तो ।

-५०-

ज्यातें मित्र नसे असा धनपती लोकेशही निर्धन ।

-५१-

पात्रीं स्नेह असे म्हणोनि झळके दीप्ती तुझी दीपका ।
त्याच्या वांचूनि सर्वही गुण तुझा भस्मत्व पावे फुका ॥

-५२-

प्रायः धृष्ट बहू जगांत दिसती वक्तेच कर्त्याहुनी ।

-५३-

लोकीं लोक बहू बहुज्ञ असती, सर्वज्ञ कोणी नसे ।

-५४-

स्वल्पें पावति खेद जे मनिं तयां स्वल्पें समाधान हो ।

# तृतीयधारा

## शालिनी

-५५-

तूं गेल्यानें काय होईल हानि। जीवा माझी? मी तुला तुच्छ मानीं॥
राखायाची श्वासरूपास तूतें। आस्था वाटे मूर्ख जे का तयांतें॥१॥
ज्या या माझ्या राहसी देहगेहीं। त्या पीडाया लाजसी ना कदाही॥
जो झालासी एवढा तूं कृतघ्न। त्या तूतें मी मानितों मूर्त विघ्न॥२॥

-५६-

तेजस्वी जे साहवे तेज त्यांचें। तत्तेजानें तेजिले ना तयांचे॥
साहों डोई ताप जो सूर्य त्याचा। ना तो पायीं साहवे वालुकेचा॥

-५७-

दासी होती जी बहूतां जनांची। माझ्या संगीं रंगली अल्प साची॥
त्या लक्ष्मीतें नेलिया तस्करांनीं। होते माझी तत्त्वतां काय हानि?॥

-५८-

जो का नेई निर्मला कीर्तिवित्ता। तेणें त्याच्या कायसें येत हाता?॥
त्या श्रीमंती ये कधीं ना तयानें। हा हा मातें मात्र दारिद्र्य येणें॥२॥

-५९-

नाना दोषां आपुल्या दावितातीं। तेव्हां शत्रू मित्रभावास जाती॥
जेव्हां लोभें मित्र मिथ्योपचारें। गाती स्तोत्रें शत्रु ते जाण सारे॥

-६०-

पंकामाजीं क्लिन्नता स्पष्ट पाहीं। ये पाण्याच्या अल्पशा बिन्दुनेंही॥
वाऱ्याची जैं अल्पही ये झुळूक। शुष्कत्वातें तो वरी शीघ्र देख॥

-६१-

पातिव्रत्य भ्रष्ट जें एकदा हो । हा हा त्याचा शुद्धरूपें न लाहो ॥
स्वातंत्र्याची गोष्ट तैशीच जाणा। गेलें जें का तें पुनःप्राप्त हो ना ॥

-६२-

इष्टालाभीं लब्ध तें इष्ट होवो ।

-६३-

जैसा जैसा लाभ होई धनाचा । तैसा तैसा लोभ वाढे तयाचा ॥

-६४-

ज्याच्या भोगीं मित्र ना संविभागी । पैशा श्रेया भोगणारा अभागी॥

-६५-

मोठ्यांमाजीं दोष मोठे असोत । जे ना मोठे त्यमधीं ते नसोत ॥

-६६-

संसारीं या रंगतें चित्त ज्याचें। होती ना त्या फारसे क्लेश त्याचे॥

-६७-

सत्पात्रीं जो आदरें देत दान । त्याचें साचें वृद्धि पावे निधान ॥

-६८-

संपत्तीनें मोहिलें ना जयाला । आपत्तीचा खेद कैंवी तयाला ? ॥

-६९-

साऱ्या जीवां पापकर्मैं कराया। भोग प्रेरी,सिद्ध व्हा त्या त्यजाया॥

-७०-

एका मारी त्या खुनी बोलताती। लाखों मारी वीर त्या लेखिताती॥

मराठी ... संग्रहालय, ठाणे.
१६४४८
अ. क्र.
विभाग ...
क्रमांक,
नों. दि. २१-४-८४
स्वस्तिक वाचनालय, ... ठाणे.

# चतुर्थ धारा

वैतालीय

-७१-

अधिकारपदावरी जरी। शुनकातेंहि निवेशिलें तरी॥
गणिती नच ना कुणी जन। शिरसा वन्द्य तदीय शासन॥

-७२-

यश शाश्वत मेळवावया। मरतो तोच जगे जगांत या॥
जगुनी यश जो न जोडितो। मृत जाणा असुनी जिवंत तो॥

-७३-

शिशुहीन न सद्म शोभतें। धनधान्यान्वित तें असे जरी॥
तम दैन्यज तेथ ना वसे। चमके जें शिशुरत्न अंतरीं॥

-७४-

सुजनावाँनि जें न कारण। बलवंता बल तें न भूषण॥

-७५-

स्वसुखीं निरपेक्ष राहुनी। परदुःखें मन होउ पीडित॥
स्वगुणां जनिं दाविल्याविना। परदोषावरणीं असो रत॥

# पंचमधारा

## स्वागता

-७६-

अध्रुव क्षणिक आय धनाचा। नित्य निश्चित असे व्यय साचा॥
आय येत मधुनी मधुनीच। सोडितो व्यय सखा न कधींच॥

-७७-

वीतशंक करुनी स्वमनातें। आफलोदय करीं सुकृतीतें॥
सोद्यमास जगिं दुर्लभ काय?। यत्नसाध्य परमेशहि होय॥

-७८-

वैर निष्ठुरपणें करितातीं। शत्रु ते मज बरे गमतातीं॥
मित्र जे वरी वरी, परि वैरी। अंतरीं, भयद वाटति भारी॥

-७९-

हा! कितीक कुसुमें विकसोनी। जाति निर्जनवनींच सुकोनी॥
लोकलोचनपथीं पडती ना। सौरभासहि कुणीच पुसे ना॥

-८०-

एकही न गुण ज्या मनुजाला। मौन थोर गुण होय तयाला॥

-८१-

जोंवरी यम न उद्यत न्याया। तद्गृहीं क्षम न कोणिच जाया॥

-८२-

ज्यांत होय नर पूर्ण कृतार्थ। तेंचि आयु जगिं दीर्घ यथार्थ॥

-८३-

पाठलाग करि दो शशकांचा। एकही करग हो न तयाचा॥

-८४-

रूप चांग जरि सद्गुणहीन। गन्धहीन सुमनासम मान॥

# षष्ठधारा

## द्रुतविलंबित

-८५-

धन असो जवळीं कितिही तरी।अधिक लोभ न कोण मनीं धरी॥
सुरनदी असतां शिरिं सांब तो। निशिदिनीं अभिषेकचि वांछितो॥

-८६-

नयनरम्य गमे आपुल्या वरा। समज तीच खरी बहु सुन्दरा॥
स्वपतिलोचन दर्पण मानिती। विमल रूपविलोकनिं ज्या सती॥

-८७-

फलभरें भरला तरु जोंवरी। दगड फेंकिति लोक तयावरी॥
वसति अंगिं बहू गुण ज्याचिया। कटुवचें खल ताडिति ते तया॥

-८८-

बुधजनीं स्वमुखें न कथा गुण। न कथिले जरि जाणति आपण॥
न कळती गुण त्यां कथणें वृथा। म्हणुनि ना अबुधांपुढतीं कथा॥

-८९-

मतिमती न कधीं रमवी तशी। सहृदया रमणी पुरुषा जशी॥
धवलवर्ण गुलाब न मोहितो। अरुणवर्ण जसा नयनास तो॥

-९०-

विधि कितीहि असे जरि कोपला। मजवरी,परवा मुळिंना मला॥
धन हरील, हरो, करु ना दया। क्षम न तो परि धैर्य हरावया॥

-९१-

स्मित मुखीं विलसे म्हणुनी कुणी। सुजनतेस वरी न गणा मनीं॥
स्मित करो कितिही तरि जो खल। निशिं दिनीं कृतिनें खल केवल॥

-९२-

अनृतनामक दुर्भग बालक। न च जगे बघण्या निजवार्द्धक॥

-९३-

मधुर वास जया कुसुमा अती। विनत तीं दिसती बहु लाजती॥

# सप्तमधारा

## भुजंगप्रयात

-९४-

अकल्याण होणार जें ना दिल्यानें। परा देत जा तें प्रसन्ना मनानें॥
नसे शक्य जो विक्रमें जिंकण्याला। अहो तोषवा सामवादें तयाला॥

-९५-

अधर्मा भिती जे तयां एक भीती। दुजी ना कधींही कुठेंही कशी ती॥
भिऊनी तया वागणें या जगांत। तदन्यां भयांचा करायास अंत॥

-९६-

करा यत्न मोठा धरा धीर चित्तीं। गमावूं नका संधि साधेल जी ती॥
सदा ईश्वरातें स्तवा भक्तिभावें। फलप्राप्तितें आणखी काय व्हावें?॥

-९७-

चकाके बहु जें, जया वर्ण पीत,। जयाचा मना मोद दे स्पर्श शीत॥
शरीरीं धरी फार काठिन्य जेंही। असें कोणतें वस्तु लोकांस मोही

-९८-

जनांहीं स्तवावें सदा आपणाला। असें वाटतें ज्याचिया मानसाला
स्वताच्या मुखानें कधीं ना स्तवावें। तयें आपणा हें स्वचित्तीं धरावें

-९९-

जयातें जया वस्तुचें काज नाहीं। तया ती मिळे अल्पमूल्यें जरीही॥
तरी ती न द्यावी तयानें मुळींच। दिलें तेंहि त्या फार वाटेल साच

-१००-

जयांतील नीरा तुवां प्राशुनीयां। तृषा भागवीली कितीदा स्वकीया॥
तया फेंकणें कूपिं पाषाण काय? तुला युक्त वाटे, वदें, हाय! हाय!॥

-१०१-

जयासाठिं हो माजवूं वाद मोठे। लिहूं लेख तैसे खरे आणि खोटे॥
लढूं संगरीं मृत्युही अंगिकारूं। जगोनी न त्या धर्मकार्यास सारूं॥

-१०२-

जुनीं लांकडें योग्य जाळावयाला। जुनें मद्य जें योग्य तें प्यावयाला॥
जुने मित्र ते योग्य विश्वासण्याला। जुनीं पुस्तकें योग्य वाचावयाला॥

-१०३-

तरूच्या परी हो गुणांची न वाढ। जरी मूळ त्यांचें असे ना निगूढ॥
म्हणोनीच ठेवूं प्रयत्नें सदाही। तया दृष्टिच्या आड मित्राचियाही॥

-१०४-

दया दाखवीणें तमाशाच जाणा। जरी पूर्ण ती अंतरंगीं वसेना॥
वृथा पूतही कर्म जें आचरीलें। जरी अंतरंगीं न पूतत्व ठेलें॥

१०५-

न ये श्रेष्ठता जीवित त्यागिल्यानें। परी त्यागिलें तें जया कारणानें॥
तयें प्राप्त हो ती नराला जगांत। सुधी हो सदा वागवा हें मनांत॥

-१०६-

नव्यातें जुन्या सारिखें भासवीणें। जुनें जें तयातें नवीनत्व देणें॥
जया ग्रंथकारांमधीं चातुरी ही। तयांचीच मागें जगीं कीर्ति राही॥

-१०७-

निसर्गोचि केला जयाशीं विरोध। तयांना दया दाविणें हें स्वसिद्ध॥
निसर्गास जे मूर्ख होती विरोधी। तयांची करी कींव तो मन्दबुद्धी॥

--१०८-

परांनीं स्तुती आपुली केलियास। तिचाही असे फायदा एक खास
गुणां वर्तमानां न दावी जरी ती। तरी जाणवी कोणते पाहिजेती॥

--१०९--

पुढें काय होणार तें जाणण्याची। जरी तर्कयोगें मनीषा कुणाची॥
तयें जाहलें काय मागें तयाचा। करावा निदिध्यास अभ्यास साचा।

--११०--

मतीच्या विकासास हेतू विपत्ति। तिला झांकुनी ठेविते संपदा ती॥
अशी भावना प्रायशः होय साची। जगीं सर्वही तत्त्ववेत्यां जनांची

--१११--

समस्तांमधीं संचरे मोह एक। परी वंचना निर्मितो भिन्न देख।
चुकोनी कुणी जातसे वामभागीं। तयानेंचि मोहें कुणी दक्षिणांगीं॥

--११२--

स्वयें मूढ ही जो स्वमूढत्व जाणे। तयाला म्हणावें कसें मूढ नेणें॥
तया आणि सुज्ञा नरांच्या मधेंही। मला वाटतें फारसा भेद नाहीं॥

--११३--

अती खोल पाणी असे ज्या नद्यांना। न हो फारसा नाद त्या वाहतांना

--११४--

घरें बांधणें राहण्या योग्य पेशीं। कशाला वृथा देखणीं मात्र खाशीं॥

--११५--

जरी मित्र व्हावा स्वयें मित्र होई। तया मेळवाया दुजा मार्ग नाहीं॥

--११६--

जरेच्या सवें वाढतें मानसाचें। तनूच्या परी जाण वैकल्य साचें॥

--११७--

जियेचेनि योगें क्षमा हिंसकाची। करी ती दया जाण हिंसाचि साची

--११८--

तडागापरी पंडितातें गणावें। झऱ्या सारिखे प्राज्ञ मानीत जावे॥

-११९-

तयांचीच वाणी पडे देवकर्णीं जयांचेनि कर्णीं पडे देववाणी ।

-१२०-

तुसावांचुनी एकही धान्य नाहीं ।

-१२१-

बहु स्तुत्य लोकीं स्वयें ऐशियांनीं।स्तवावें तुला हें खरें भाग्य मानीं

-१२२-

बहु मानवांना बहु दैव देतें।कुणालाहि दे ना पुरेंसें परी तें ।

-१२३-

मनीं धीर विक्रान्त जे का तयांतें।असिद्धीच कीं सिद्धिसोपान वाटे

-१२४-

स्तवी जो जया तो तयाच्या स्तवाची।अपेक्षा करी प्रायशः रीत हेचि

# अष्टमधारा

—०—☰—०—

## इंद्रवज्रा

-१२५-

चाखे तया मात्र जनास येतो । उन्माद मद्यें इतरां न ये तो ।
लावण्यमद्या तव रीत खाशी ! देखे तुतें त्यासहि माद देशी ॥

-१२६-

जो अग्नि पायीं तुडवोनि जाय । धूमावरोधास गणील काय? ॥

-१२७-

धीमत्त्व जाणा धन निर्धनाचें ।

-१२८-

नीचावमानें मलिनत्व जीस । भोगी असा जो जन संपदेस ।
कर्पूरचर्चा रचि तो स्वदेहीं । अभ्यक्त जी हो लशुनेंचि पाहीं ॥

-१२९-

पत्नीसवें भूवरि राहुनीयां । घालों सुखें दिव्यचि सेवुनीयां ।
स्वर्गी मला ती जर ना दिसेल । हा! स्वर्गही स्वर्गपणा त्यजील ॥

-१३०-

भोगाभिलाषासचि बन्ध माना । तत्त्याग हा मोक्ष, दुजा न जाणा ।
हें ज्ञानसर्वस्वचि जाणुनीयां । वागेल जो तोचि सुधी जगीं या ॥

-१३१-

सर्वत्र सर्वांस करावयाचें । आहेच कांहीं तरि कर्म साचें ।
स्वेच्छास्वशक्तिप्रसरें प्रवृत्त । होतील तेथें जरि ना निवृत्त ॥

-१३२-

सायासही जें रमवी मनातें। तें कर्म हारी सकलां श्रमातें।

-१३३-

स्वामित्व लक्ष्मीस कधीं न येवो। दासी अलक्ष्मी सदनीं न होवो

-१३४-

हा ! निर्धनांचे कुणिही न बन्धु।

## उपेन्द्रवज्रा

-१३५-

जसा दिसूं इच्छिसि तूं जनातें। तसा शिकें सत्याचि व्हावयातें॥

-१३६-

दुजावरी जो न दया करील। दयार्ह तो केंवि कुणा गमेल ?॥

-१३७-

नृपांहुनी मित्र जगांत थोडे।

-१३८-

स्वयें भयें कंप सुटे कितीकां। दटाविती ते परि अन्य लोकां।

# नवमधारा

## मालिनी

-१३९-

चढण कठिण मोठी ही असे कीं चढाया
परि वरि बहुयत्नें जाहलों सिद्ध जाया ।
चढुनि विमल कीर्ती जी पुढें लाधणार
मजसि बल चढाया देतसे तीच फार ॥

-१४०-

नमवुनि अपुणातें नम्र ने उन्नतीतें ।

-१४० अ-

प्रणयकुपित ऐसा वल्लभावल्लभांचा
सुचिरतर कुठोनी कोप राहावयाचा ? ।

-१४१-

मरणभय जयाच्या नित्य जाचे मनाला
क्वचितचि जगिं लाभे दीर्घ आयुष्य त्याला ।

-१४२-

सुखकुसुम कुणाचें लग्न होतां विकासे
अहह ! परि कुणाचें म्लान होवोनि नासे ।
तरुतळिं जलसेकें होय जें कार्य कांहीं
तदुपरि हिमसेकें साच तें होत नाहीं ॥

-१४३-

सुचरितसुमनांचें कीर्ति सौरभ्य साचें ।

-१४४-

स्खलितमय जयाचें सर्व तारुण्य जातें
अनुशययुत त्याचें साच वार्द्धक्य होतें ।

# दशमधारा

## रथोद्धता

-१४५-

अंतरीं उदय पावला तरी। बोधसूर्य न तमास संहरी।
ज्यांचिया कुजन तेंचि कीं अति। सत्य उक्ति परिसोनि कोपती॥

-१४६-

ज्ञानशैल अति उंच दुस्तर। थोडकेच चढतात त्यावर।
शक्य धर्मपथ आक्रमावया। ना कुणासही नसे जगांत या॥

-१४७-

दीपिका तिमिर नित्य खातसे। कज्जलास म्हणुनीच वीतसे।
जें करील नर अन्न सेवन। तत्प्रजा वरिल जाण तद्गुण॥

-१४८-

धाडितो व्यसन जें जनार्दन। नीतिपुष्टिकर तें रसायन।

-१४९-

मान्यता अनुसरे तया नरा। जो पळे त्यजुनियां तिच्या करा।

-१५०-

शोचनीय किति ही असे स्थिति ?। कीं स्वदेशहितरक्षणाप्रति।
एकदाचि निजजीवितार्पण। अन्यदा करुं शकों न आपण॥

-१५१-

साधुसंगम भेषजसेवन सर्वथा भवरोगनिवारण।

[ वरील श्लोकांत अधोरेखित अक्षरांचीं लघुगुरुत्वानें उलटापालट करून नवीन वृत्त निर्मिलें आहे. ]

पृथ्वी

-१५२-

अलोट धन वेंचिल्याविण न जें मिळे सौख्य तें।
न सौख्य मिळणें मुळीं उचितसें मला वाटतें ॥

-१५३-

बरी मरुनि मान्यता न जगुनी अकीर्ती परी।

-१५४-

मितव्ययचि हा स्वयें गमत आय मोठा अति।

-१५५-

विचार अनुदार ये कधिं हि ना जयाच्या मनीं ॥
कृती सदयता सदा प्रकटवी जयाची जनीं ॥
अभीष्टफल लाभल्या वरिहि जो न गर्वा भजे ॥
सुदुर्लभ असा खरा पुरुष थोर तो जाणिजे ॥

-१५६-

शिरें सरळ वाहती खळ किती तरी फांकडी !
परंतु धरिती मती अहह त्यांमधीं वांकडी।

शिखरिणी

-१५७-

....................तनु हि झळके तेज तिमिरीं

-१५८-

विझालासा वाटो अनळ सगळा बाहिरुनियां।
परी भस्मापोटीं कधिंकधिं वसे तो दडुनियां ॥

-१५९-

विधात्यानें केली कृति कधिंहि हो ना अपकृति ।

## औपच्छंदसिक

-१६०-

बलवंत बळें न गौरवास । चढतो केवळ या जगांत खास ॥
उपयोग जरी करी बळाचा। शुभकार्यीं तरि मान हो तयाचा ॥

## तोटक

-१६१-

मृतिनंतर विस्मृत होति न जे। मृतही मृत ते न असें गणिजे ॥

## प्रमिताक्षरा

-१६२-

अभिनंदिलें सजयघोष जरी । अघ पावतें जय जगीं न तरी ॥

## वसन्ततिलका

-१६३-

तें तेंच पाप फिरुनी फिरुनी कराया ।
पापी सजे करुनि जो अनुताप वांया ॥
तो ओकलेंचि जणु अन्न पुनःहि सेवी ।
हा हा अमंगलरती किति ही वदावी ! ॥

-१६४-

दीनांस देइं धन हात पुढें करोनी ।
प्रेमें स्वयें जवळ जाउनि आदरोनी ॥

लावीं न त्यांस अपुला पसरावयास।
लाजोनि हात पुढतीं कधिं मागण्यास ॥

-१६५-

श्रीमंत ते न बहुधा जगिं बुद्धिमंत।
धीमंत जे न धन त्यांस करी पसंत ॥

-१६६-

सर्वत्र नील नभ हें समजोनि घ्याया।
भूमंडळावरि कुणा न लगे भ्रमाया ॥

-१६७-

हे साउली सहचरी तंव मानवांची।
सूर्यातपीं जंव गती असते तयांची ॥
ती सोडते परि तयांस अनातपांत।
ऐशीच रीत कुसखे जगिं दावितात ॥

कामदा

-१६८-

काय साध्य हें प्रथम जाणणें। साधनांप्रती मगचि पाहणें ॥

-१६९-

पंडितापरी बोलती किती। मूर्ख वाटती दावितां कृती ॥

-१७०-

रूप करितसे चकित लोचना। गुण परांचिया वश करी मना ॥

-१७१-

साधुसंगमीं पातली जरी। आपदा गमे संपदेपरी।
संपदा परी दुष्टसंगमें। आपदेपरी सज्जनां गमे ॥

# एकादशधारा

## दिंडी

-१७२-

कुमति कोपे उपदेश ऐकुनीयां। सुमति चित्तीं धरि हर्ष पावुनीयां॥
एक लेखी उपदेशकास निन्द्य। अन्य मानी त्याजला नित्य वन्द्य॥

-१७३-

जयां ग्रंथा प्रयशः प्रकाशोनी। मुद्रकांची जाहली अर्थहानि॥
वृद्धि विद्येची तयांनींच लोकीं। बहू झालीसे स्पष्ट हे विलोकीं॥

-१७४-

जशी प्रीती स्वात्मजीं मानवाची। तशी दुजियाच्या आत्मजीं नसेचि।
आत्मजन्य प्रिय वाटती प्रमाद। जरी इतरीं निर्मिती ते विषाद॥

-१७५-

नसे विकण्याचा माल जया पाशीं। तये बसणें बाजारिं कासयासी?
विपुल जवळीं ज्याचिया असे त्याची। ऋद्धि गल्लींतहि बसुनि
व्हावयाची॥

-१७६-

पतन पावे सहसा न पुण्यवंत। व्यथा मंदचि पडलिया तया होत॥
पंकयोगें माखेल सकल अंग। प्रस्तरीं ना होईल अस्थिभंग॥

-१७७-

परम ऊर्जित हें भाग्य वाङ्मयाचें। सकल जगतीं प्रत्यया येत साचें
अशोभन जें तेंचि कीं लया जाई। सुशोभन जें चिरकाल तेंचि राही॥

-१७८-

बुद्धिमंता धन मान नसे ज्याला। वाङ्मयाचा पथ असे खुला त्याला
सुखें करुनी संचार त्यांत तेणें। कीर्तिदेवीच्या मंदिरास जाणें ॥

-१७९-

मित्र आणी कालिंग फळें मातें। तुल्य वाटति, सांगतों कारणातें॥
एक उत्तम लाभण्या शंभरांस। पारखोनी लागतें पाहण्यास ॥

-१८०-

विधात्यानें निर्मिलें मानवांचें। हृदय मृदु हें प्रत्यया येत साचें ॥
जरी असतें ते कठिण तयें केलें। अश्रु नसते नेत्रांत निर्मियेले ॥

-१८१-

विमल वापी तीमधीं कमलपंक्ति। कमलिं भृंगांचे संघ बैसताती ॥
भृंग आंतिल मकरंद सेविताती। करुनि गुंजारव कर्णसौख्य देती ॥

-१८२-

विसर अपुला न च पडो जनां मागें। अशी इच्छा जर मनीं तुझ्या वागे
लिहीं कांहीं जें लोक वाचतील। करीं कृति वा जीविषयिं लिहीतील

-१८३-

सुफल पात्रीं तुच्छही दान होतें। हानिकारक अन्यथा दीधलें तें॥
गवत धेनुस चारिल्या दूध दे कीं। दूध सापा पाजिल्या गरल ओकी॥

-१८४-

हात उजवा उद्योग असे श्रीचा। तसा डावा तो मितव्ययाचि साचा॥
धरी घट्टाचि जो हात तिचे दोन्ही। तया पासुनि ती जाय ना पळोनी

-१८५-

अर्थ जैसा हो मूळ अनर्थांचें। फळहि तैसें तो होय कीं तयाचें ॥

--१८६--

अहंकारें जो पूर्ण भरुनि ठेला। पूर्णतेनें तो रिक्त राहियेला ॥

--१८७--

चित्र सुंदर जें काव्य शब्दहीन।

--१८८--

देहगेहांतुनि जीव न्यावयाला। बहुत दारें मोकळीं अंतकाला ॥

--१८९--

पाडियेल्यावरि पादपास त्याची। साच अस्ता साउली जावयाची॥

--१९०--

लोक बोलति बोलोत तें न मानीं। शुनक भुंकति भुंकोत, काय हानि?।

--१९१--

लोभ वाढे वाढत्या सुवर्णानें।

--१९२--

विजययोगें उन्नती पावण्यातें। सदा स्पर्धा निरखिते सद्गुणातें ॥
अभ्यसूया हुडकिते परी दोष। द्वेषयोगें पाडाव करायास ॥

---

# द्वादशधारा

——:o:——

## वृत्त–साकी.

-१९३-

अपकाराचें नसेल साधन जेव्हां तुझिया पाशीं ।
शत्रूंचे अपराधचि पोटीं घालीं युक्ती खाशी ! ॥

-१९४-

आधीं चित्तीं पुढतीं देहीं संत जरा वरिताती ।
दुर्जन देहीं परी कदाही चित्तीं ठाव न देती ॥

-१९५-

उभयकरांनीं करावयातें समर्थ जें का स्वामी ।
त्याहुनि शतगुण करील एका नयनानें ही नामी ॥

१९६

कण कण संग्रह करितां कांचनसंचय कुशल करील ।
पळ पळ साधुनि वेळ खरोखर बहु विद्या मिळवील ॥

-१९७-

'करीन हें मी' 'करीन तें मी कधिं ना कधिं तरि' ऐशी ।
हांव धरिसि परि मरेन कधिं तरि ; हें विसरुनियां जाशी॥

-१९८-

जनक दयाळू तैशी जननी साच असे या लोकीं ।
जगताचा तो ईश दयाळू उभयांहुनि हि विलोकीं ॥

-१९९-

जलधर होतां लोचनगोचर छत्रीविण नच जावें ।
हें सुज्ञांप्रति कधिं हीं न लगे कोणीही सांगावें ॥

-२००-

जल दे कमला जन्मचि केवळ रविकर लक्ष्मी देती ।
कवि काव्यातें निर्मी, त्याची रसिकचि करिती ख्याती ॥

-२०१-

जो चढतो तो पडतो ऐसें वच प्रतीतिस येतें ।
सुखें चढाया साधन पडणें केव्हां केव्हां होतें ॥

-२०२-

जोंवरि पूर्णपणें भरलासे घट आनन्दरसाचा ।
तों वरि सुवहाचि, परि हो दुर्वह भार रितेपणीं त्याचा ॥

-२०३-

ज्याच्यासाठीं निजजीवितही सोडाया जी राजी ।
त्या जननीला पत्नीसाठीं सोडी सुत तो पाजी ॥

-२०४-

प्रश्न—

ज्याच्या प्राप्तीस्तव जगण्याचे कष्ट सोशितों मोठें ।
मरावयाही धजतों तें सुख आहे सांगा कोठें ? ॥

उत्तर—

जें मिळवाया झटतों सारे परि जें दुर्लभ आहे ।
शोधुनि जें जगभारिहि न गवसे अपुल्यासंनिध राहे ॥

२०५

ज्या मानानें उंची व्हावी भवनाची अपुनाला ।
त्या मानानें पाया त्याचा खोल पाहिजे केला ॥

–२०६–

तरुणां वाटे जरठ जगांतिल मूर्खाचि सारे ऐसें ।
जरठ परी जे ते मनिं जाणति साच तरुण ते तैसे ॥

–२०७–

तरुशाखेवरि सुखेंचि बसतो तो खग शरहत होतो ।
उडे तयाचा मृत्यु टळे परि आळस भयद गणा तो ॥

–२०८–

तृष्णारूपी कृष्णभुजंगी ज्याच्या अंतरिं राहे ।
तया नराचा तरुपरि संश्रय सुखद कुणाही नोहे ॥

–२०९–

दिवसा दिनकर निशीं निशाकर बाह्य तमास हराया ।
क्षम बुधवचनें आभ्यन्तर तम निशिदिनिं दूर कराया ॥

–२१०–

दुर्गुणयुत जे त्या सगळ्यांचा नका करूं तिटकारा ।
एकहि सद्गुण नसे जयांमधिं त्यां सर्वां झिडकारा ॥

–२११–

धीधन व्हावें परी न धनधी कधिंही सुधी नरानें ।

–२१२–

निर्धन लोकीं दुःखी जाणा ऋणपीडित त्याहून ।
त्या दोघांहुनि रोगी दुःखी कुभार्य सर्वांहून ॥

-२१३-

पवन जवानें वाहो कितिही काय दिगन्तां लंघी ?।

--२१४--

पाप करोनी अनुतापातें पावे तो न च निन्द्य।
जो न करी परि पापचि तो जन त्याहुनि अधिकचि वन्द्य॥

-२१५-

पुरुष सपौरुष कोणाचाही कधिंहि करीना द्वेष।

-२१६-

मारिति भीरू निर्दयतेनें परि करुणापर शूर।
आनन्दानें राखिति करगत वैरिजना साचार॥

-२१७-

मूर्ख नटांमधिं नट मी आलों नाटक दावायाला।
जाणुनि जन्मा येतां क्षणिं शिशु लागे रडावयाला॥

-२१८-

मेषगणाचा नायक असला सिंह तरी चालेल।
सिंहचमूचा मेषचि होउनि नायक काय करील ?।

२१९

रमणीयोगें किमपि नरांचा परुषपणा जरि उरला।
पुढतीं शिशुगण जमतां भंवती खास पाहिजे गेला।

२२०

रवि शशिता धरि शशी रवित्वा वासर रजनी होती।
रजनी वासर सुखदुःखांचा प्रसर होय जइं चित्तीं॥

२२१

वसुंधरेच्या उदरीं रत्नें किती तरी आहेत ? ।
तशींच मुक्ताफळें कितिक तीं गुप्त असति जलधींत ? ॥
पूर्वि न कोणालाही दिसलीं असतिल जीं केव्हांही ।
पुढें न लोचनगोचर होतिल बहुधा कोणाच्याही ॥

-२२२-

विकारवंता आयुष्याची मृत्यू परमा सीमा ।

-२२३-

विनय विरूपाचि गुणहीन जरी विनयाविण गुण निन्द्य ।
विनयान्वित जन गुणिगण गणिती द्विगुणचि जगतीं वन्द्य॥

-२२४-

वैधव्याच्या भीतीनें मी शूर पुरुष न च वरित्यें ।
देउनि टाकिल इतरां म्हणुनि न उदारगृहिणी होत्यें ॥
सवत नको मज म्हणुनी पंडितजनास मी नादरित्यें ।
दोष समस्तहि हे टाळाया कृपणा पसंत करित्यें ॥

-२२५-

न गर्हणा क्षम होई तितुकी शमवायातें पापा ।
वाटे मजला होइल जितुकी बहुधा ती अनुकंपा ॥

-२२६-

श्रोतृजनांतें प्रत्यय पटवी अवसरपठिता सूक्ति ।

-२२७-

सज्जनकांचन शिक्षणदहनीं विशुद्धतेला घेई ।
दुर्जनरूपी अंगार परी भस्म मषी वा होई ॥

काव्य

-२२८-

सिंहासन जनहृदय जयाचें तदधिष्ठितचि विराजे ।
ऐसा नरपति धन्य जगामधिं तदितर पशुपति राजे ॥

-२२९-

सौन्दर्याहुनि विलास मोहक अधिक असे युवतींचा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. १६४४८
स्वस्तिक ग्रंथालय, ठाणे.

# द्वादशधारा

आर्या

-२३०-

आज्ञाताचें ज्ञापन इतुकेंचि न कार्य शिक्षणें करणें।
आचार शिष्टसंमत सेवाया लावणें जनां तेणें॥

-२३१-

अणुही असज्जनाचा संग करी गुणविभंग इतराचा।
दुग्धाच्या गुणरूपा बिघडवि कीं थेंब एक ताकाचा॥

-२३२-

अतितर परिणत जें फल तें पडतें पाहतों प्रथम धरणीं।

-२३३-

अणु बहुता बहु अणुता गुण सज्जन-दुर्जनाश्रयें पावे।
सित-असितपक्षयोगें वृद्धिक्षय विधु वरी, न कां ठावें?॥

-२३४-

अत्यल्प आयु अपुलें ऐसें गातों सदैव रडगाणें।
परि वागतों असे कीं जणु याचा क्षय कधींहि न च होणें॥

-२३५-

अधिपति हो जो तेणें अंधत्वातें कधीं काधिं वरावें।
पावे भृत्यपणा जो तेणेंही काधिं कधीं बधिर व्हावें॥

-२३६-

अनय यशस्वी झाला तरिहि तयाचा टिके न जय सुचिर।

-२३७-

अनुकूल दैव असतां धन द्यावें, कीं हरी पुरविणार।
असतां प्रतिकूलहि तें द्यावें, कीं तोचि सर्व हरणार॥

-२३८-

अनुभव नामें शिक्षक शिकवी बहु सावकाश शिष्यांसी।
गुरुदक्षिणा चुकांची लाखोली मागतो तयापाशीं॥

-२३९-

अनृतासक्त असा जगिं एकचि कीं जीव, नाम त्या मनुज।

-२४०-

अन्तःपुरगतललनागणरक्षण जेंवि कुंचुकी करिती।
तेंवि अशिक्षित जे का तेही ग्रन्थांस आदरें जपती॥

-२४१-

अपराध तुल्य करिती दोघे, परि भिन्न भिन्न फळ दिसतें।
एक सुळावरि चढतो सिंहासन लाभतें दुजा परि तें॥

-२४२-

अपकार करायातें अन्यातें न च समर्थ म्हणुनीच।
साधुपणा येत कुणा कुजनांतेंही जगामधीं साच॥

-२४३-

अपकारें साधूंचें वाढे साधुत्व उत्तरोत्तर तें।
चंदन उगाळिल्या वा तोडियल्या अधिक सौरभा वमतें॥

-२४४-

अभिनव यौवन असतां पुरुषांच्या स्वामिनी स्त्रिया होती ।
सोबतिणी मध्यमवयिं धात्रीकर्मास वार्द्धकीं करिती ॥

-२४५-

अवसर न मिळाल्यानें निष्फळ हो सर्व बुद्धिसामर्थ्य ।

-२४६-

आधींच खल तयांतुनि नृपवल्लभ जो महाभयंकर तो ।
अनल सुदुःसह किति हो ! प्रबलाचि जरि अनिल साह्य त्या करितो॥

-२४७-

आधीं देवास भितों मग जो त्यातें न भी तयास भितों ।

-२२३-

इतुके उघडे नसते कान जरी ऐकण्यास लोकांचे ।
नसतीं तोंडें इतुकीं उघडीं झालीं वदावया वाचे ॥

-२४९-

( टि. सु. सं. १८१७ )

उगवे बहु तेजस्वी तो रविही खास मावळायाचा ।
साम्राज्य ऋद्ध असलें कितिही, त्याचाहि अंत व्हायाचा ॥

२५०

उंच चढा हृदयांनो या या ओंठासमीप चढुनीयां ।
चुंबितसों अन्योन्या दोघें, जा झणिं तुम्हींहि भिडुनीयां ॥

-२५१-

उद्यम, इन्द्रियसंयम, मितव्यय न हे जयामधीं तीन ।
गुण बाणले तयाच्या हातीं धन राहणें बहु कठिण ॥

-२५२-

उद्योगविमुख जे का अभिमुख त्यातें न देवही असतो ।
परि जे उद्यमपर नर त्यांस परात्परहि आपुले म्हणतो ॥

-२५३-

उद्योगाची आवड पुत्रीं उत्पन्न जो पिता करितो ।
तोचि खरा हितकर्ता त्याचा, धन राखितो तदर्थे न तो ॥

-२५४-

उन्नतपदलाभाची हाव धरी त्या परीस भृत्य भला ।
एकचि ह्या सेव्य असे, तो आराधी समस्त जनतेला ॥

-२५५-

उपदेश ऐकतांना बधिरपणा येतसे जयां कानां ।
ते ऐकती निजस्तुति निपुणपणें केंवि ? गूढ समजेना ॥

-२५६-

उमले कमल तदा तें निजमकरन्दा न झांकुनी ठेवी ।

-२५७-

ऋण फेडिल्याविना जो दे दानें तो मळा निजांगींच्या ।
धुतल्यावांचुनि कंठीं करि धारण मालिकाचि पुष्पांच्या ॥

-२५८-

ऋणरूप सांपळ्यामधिं शिरणें सर्वा असे बहु सुघट ।
शिरल्यावरि परि निघणें त्यांतुनि बाहेर होतसे बिकट ॥

-२५९-

एकचि रिपू असो का अल्प तया मानणें नसे उचित ।
मित्र जरी शंभरही जाण पुरेसे न ते गणुनि बहुत ॥

-२६०-

एकाच्या छंदानें होणें वागावयाप्रती राजी ।
सर्वांच्या आपत्तिस कारण झालें पहा जगामाजीं ॥

-२६१-

( टि. सू. सं. २७ )

पैलतिरावरि बसुनी नुसता संकल्प जो मनीं करितो ।
पैलतिरीं जायाला होईल समर्थ काय कधि तरि तो? ॥

-२६२-

ऐसें कर्म न कीजे जें लपवावें असें तुला वाटे ।

-२६३-

औद्धत्य सशक्तांना अन्य जनांच्या अपौरुषें येतें ।

-२६४-

कार्यें करितां करितां करण्याची शक्ति वृद्धि पावतसे ।
करितां अधिक परिश्रम विश्रमही साच अधिक लाभतसे ॥

-२६५-

कांहीं दोष गुणांशीं इतुके संलग्न जाहले असती ।
कीं त्यांचें निर्मूलन करितां गुणही लयाप्रती जाती ॥

-२६६-

कीर्तीची हाव नरा जितुकी तितुकी नसे गुणांची ती ।

-२६७-

कृतिरूप उक्ति बोला कीं गेला काळ उक्तिचा आतां ।
केवळ कृतिच पुरेशा येइल त्यांनींच साध्य तें हातां ॥

-२६८-

केवळ शोभादायक न गुणा रक्षक गमे विनय साचा ।

-२६९-

कोण गणील महोर्मी लंघियल्या तीर गांठिल्यावरतीं ? ।

-२७०-

कोणी जन्मुनि पेरण कोणी घण जाहले जगामाजीं ।

-२७१-

खलजानें उपकृति केली होते हेतू महा अनर्थास ।
अनुकूलाचरणानें अधिकचि ये जोर कां न रोगांस ? ॥

-२७२-

खाद्य खगांचें विधिनें निर्मियलें परि न जवळ ठेवियलें ।
तत्प्राप्तीस्तव त्यांहीं आकाशीं नित्य पाहिजे उडलें ॥

-२७३-

गांभीर्याची हानी दैर्ध्यानें भरुनि काढितो वक्ता ।

-२७४-

..................घनतिमिरिंहि शर्करा असे मधुरा ।

-२७५-

चोरग्रहणीं कीजे कीं चोराचीच योजना बरवी ॥

-२७६-

जगणें अवश्य जेव्हां तेव्हां जो इच्छितो मरायातें ।
तो एक भीरु, दुसरा मरणसमायें वांछितो जगायातें ॥

-२७७-

जगदादर्शी द्रष्टा पाहे छाया स्वकीयवदनाची ।
संक्रुद्ध स्मितयुत वा तें जरि तीही तशी दिसे साची ॥

-२७८-

जितुके लोक धनानें लोभी आहेत जाहले जगतीं।
तितुके न च लोभानें धनवंतपणास पावले असती ॥

-२७९-

जिह्वाशस्त्र जयांचें ते प्रायः संकटीं जरी पडती।
निजरक्षण करण्यातें चरणयुगाचाचि आसरा करिती॥

-२८०-

जीवित जाळें विणिलें विधिनें गोवोनि तंतु शुभ अशुभ।

-२८१-

जीवित दिवसासम हें शैशव माना सकाळची वेळ।
व्यर्थचि बाळांनो तरि केवळ दवडा न खेळुनी खेळ।

-२८२-

जे ते स्वसुख पहाती, टाळाया दुःख आपुलें झटती,।
आस्वाद परसुखाचा घ्यायाला क्षम किती परी असती ? ॥

-२८३-

जें इच्छी करण्या जो तें करण्यातें न तो शकेल जरी।
तेंचि तयें इच्छावें करण्यातें जें गमेल शक्य तरी ॥

-२८४-

जें ज्यातें प्रिय असतें त्याचे ठायीं ममत्व हो त्याचें।
विश्व प्रिय विश्वेशा म्हणुनिच तेंही तदीय, न दुज्याचें ॥

-२८५-

ज्ञान अनल्प जयाचें बोले अत्यल्प बोल तो वाचे।

--२८६--

ज्यांचा तूं आज्ञाकर त्यांचें भय मानसीं जरी तुजला ।
आज्ञाकर जे तव त्यां भयद न हो हाचि मार्ग जाण भला ॥

--२८७--

डाग हिऱ्यावरि पडला संस्कारें लुप्त हो, न किमपि टिके ।
वदनविनिर्गत दुर्वच कधिं न कुणीही पुसूनि टाकुं शके ॥

--२८८--

तारक मारक ऐसें तत्त्व पदार्थांमधीं असायाचें ।
भासित करि जो भावां भसितहि करि तोचि पावक तयांचे ॥

--२८९--

तुज न कधीं जो विसरे विसर न त्या अंतका अरे मनुजा ।

--२९०--

तूं पतनशील मुसलासमचि खला बहु भला मला गमसी ।
दुरुनिच नमितां तुजला स्वमुखें बहुधान्यखंडना करिसी ॥

--२९१--

तोचि खरोखर बहिरा ऐकत असतांहि नायके जो का ।

--२९२--

थोड्याशा विपदेचें मिश्रण झाल्याविना न कोणाची ।
बहुधा जगतीमाजीं निरपाया संपदा टिकायाची ॥

--२९३--

दाते सेव्यचि सानहि न च मोठे जे न दान देताती ।
उदकार्थी जन सोडुनि जलधीला कूपसंनिधीं जाती ॥

-२९४-

दात्याच्या हार्दानें दाना प्रियता महार्हता येते ।

-२९५-

दानानें उन्नति ये न च केवळ संचयेंचि कोणाला ।
वारिद उंचावरतीं वारिधि खालींच कीं असे ठेला ॥

-२९६-

दारिद्र्यशृंखलेनें जखडुनियां आपुणांस टाकियलें ।
अपकार करायातें वांछितसों, परि न अंगिं बळ उरलें ॥

२९७

दिनकर अंतक यांची पितृतनयांची प्रदीप्ति बहु झळके ।
संमुख लावुनि दृष्टी कुणिही त्यांच्याकडे न पाहुं शके ॥

-२९८-

दीर्घानुभवामधुनी लघु वचनां निवाटिल्या म्हणी ह्मणती ।

--२९९--

दुर्गुण शिकण्यालागीं न लगे गुरुसंनिधीं कुणा जाया ।

-३००-

दुष्टत्व दुष्कृतीचें पावे द्वैगुण्य दुष्टवाणीनें ।

-३०१-

दृष्टिस करी तिरोहित तिमिरापरि तेज ही वितत जें का ।

-३०२-

देवाशीं शूर असे मनुजांसी भीरु जो वदे अनृत ।
देव करी दण्ड, न परि नर, ऐसें तन्मनीं असे वसत ॥

-३०३-

द्रव्याचा माज जसा दैन्याची लाज तेंवि योग्य नसे ॥

-३०४-

द्वेषूं धन मान अम्हीं ऐसें जे लोक बोलती कोणी ।
सत्यचि जाणा वदती खोटी त्यांची असे न ही वाणी ॥१॥
अपुल्या धनमानातें उद्देशुनियां असें न ते वदती ॥
इतरांसि जरि मिळालीं तीं, त्यांचा द्वेष साच ते करिती ॥२॥

-३०५-

धनवंतपणा म्हणजे काय? जया हें कळे न मनुजाला ।
व्हावें कधिंहि न तेणें धनवंत जगीं फजीत व्हायाला ॥

-३०६-

धैर्यानें दैन्य जसें शोभे जैसें कुरूप शीलानें ।
कुवसन धवलपणानें कदन्नही रुचिर होय कढतपणें ॥

-३०७-

न कळत परहित करणें सुजनें जैशीच तस्करें चोरी ।
त्यापरिच लाजणें ही निजकृति लोकांत गाजतां भारी ॥

-३०८-

न च वदसी, न च बघसी, न च ऐकसि मम विलापही दयिते ।
ठेवुनि निजमन येथें जासि कुठें ? चित्त तुजासि अनुसरतें ॥

-३०९-

न च वांकविल्यावांचुन करितें धनु आपुलें बळ प्रकट ।

-३१०-

न ढळे मुळिं ऐसी धृति लक्ष्यापासुनि वळे न असि दृष्टी ।
न चळे कधिं असि बुद्धी ह्यांच्या स्वाधीन सिद्धि जगिं असती ॥

-३११-

नसते गुण राजांचे जो स्तवितो दण्डपात्र तो खास ।
साच तयां तो निन्दी परि होई दण्ड ना कधीं त्यास ॥

-३१२-

नानारागमनोहर इन्द्रायुध चिर टिके न आकाशीं ।

-३१३-

नाहीं तें जेंवि नसे तेंवि असे तेंहि नाहिंसें कृपणा ।

-३१४-

निजगुण परदोष तसे असतेही बुध न वानिती वाचे ।
परि खल ते नसते ही ज्या त्या पाशीं सदा वदायाचे ॥

-३१९-

निजविभवसदृश देई जें देणें दान तें, नसो न्यून ॥
ना तरि तव विभवातें दानसदृश विधि करील हें जाण ॥

-३२०-

निर्धन ही तुष्ट धनी सधन असंतुष्ट जाण निर्धन तो ॥

-३२१-

निर्यातन निकृतीचें क्षुद्रमनाचें असे सुख क्षुद्र ॥

-३२२-

निर्विद्या मूर्खाहुनि शिकलेला मूर्ख मूर्खतर साच ॥

-३२३-

नेता निपुण असालिया अनुयायी खास निपुण होणार ॥

-३२४-

न्यायाधीश वृकचि जर ईशाविण कोण तारि मेषास ॥

-३२५-

पंकीं सुगंध न वसे दिसे परी पंकजीं मनोहारी ।
अनलातें जल शमवी, जनकाहुनि जन्य तेज दे भारी ॥

-३२६-

पद भीति चित्तिं करिते बळवंताच्या बळास तैं हरिते ।
त्यातें दुर्बळ करुनी तच्छत्रूच्या बळास वाढविते ॥

-३२७-

परकीय दोष पुढतीं निजदोषां मागुतींच ठेवितसों ।

-३२८-

परदास्य परिहराया वांछितसे जो जगीं नर तयानें ।
सत्याच्या दासत्वा स्वीकारावें विशुद्धभावानें ॥

-३२९-

परवचनापावकाचा शमवाया दाह ना उपाय दुजा ।
स्ववचनमधुप्रयोगें विफलत्व तयास ये असें समजा ॥

-३३०-

परसुखवृद्धी करणें हेंचि असें स्वसुख साधणें अतुल ।

-३३१-

परसुखसाधनिं करि जो यत्न तया तोचि ने समुन्नतिस ।

-३३२-

पांडित्य पंडितांचें केवळ ये पंडितोपयोगास ।
प्रज्ञांची प्रज्ञा परि उपयोगी हो बुधाबुधजनांस ॥

-३३३-

पापें जों जों वाढति तों तों पापत्व त्यांतलें लोपे ।

-३३४-

पिउनी ... पोटभरी लाथाडी पानपात्र जो दूर ।
तो खर खराचि, तत्सम तो हि गणा जो असे कृतघ्न नर ॥

-३३५-

पितरांची पोरांवरि जितुकी बलवत्तरा असे प्रीति ।
पोरांची तितुकी जगिं तयांवरी प्रायशः दिसे ना ती ॥
मनुजावरि देवाचें प्रेम असे जें न अंशही त्याचा ।
देवावरि नर करिती म्हणुनिच सिध्दान्त हा ठरे साचा ॥

( वंशस्थविल )

" नदीपरी प्रीतिहि निम्नगामिनी "

-३३६-

प्रतिकार करायाचा धनक्षयाचा उपाय मज न सुचे ।
करणें कुचंबणा न च काढुनियां व्यर्थ कर्ज दुसऱ्याचें ॥

-३३७-

प्रतिकूल अशा पवनीं गगनीं जरि उडविला पतंग असे ।
अति दूर चढे तो वर धीराचें धैर्य संकटीं विलसे ॥

-३३८-

प्रतिभाशाली ऐसे द्विविध जगीं ग्रंथकार आढळती ।
करिती विचार आपण अन्यविचारास वा गती देती ॥

-३३९-

प्रतिभाशाली मानव मोठ्या कार्यास हात घालितसे ।
व्यवसायपराचि नर परि तदन्तगमनीं समर्थ होत असे ॥

-३४०-

प्रबल परी जो अकुशल त्याहुनि दुबळा बरा असे कुशल।

-३४१-

प्रियजनवियोग साहूं, द्वेष्यांच्या संगती न परि राहूं।

-३४२-

प्रिय जे त्यांच्या प्रेमा प्रगुणित करि योजिली प्रिया वाणी।
जे द्वेषी त्यांच्याही द्वेषातें विगुणता तशी आणी॥

-३४३-

प्रीति कला हृदयांची आणि कलांचें ह्मणूं तिला हृदय।

-३४४-

बहुजनकर्तृक ह्मणुनी धर्माचे भिन्न भिन्न पथ असती।
ईशैककर्तृका ही एकचि सर्वत्र म्हणुनियां नीती॥

-३४५-

बुडतां जलीं तराया नर काडीचाहि आसरा करितो।

-३४६-

ब्रह्म्यानें कर्म जगीं दण्डाया निर्मिलें न मनुजांस।
फलद असे, बलद असे, सुखद असे हें यशोदचि तयास॥

-३४७-

भयसंवरणा करिती कितिदा धैर्यप्रदर्शनें धूर्त?।

-३४८-

भार सुदुर्वह होतो युक्तीनें वाहिल्यास सुखवाह्य।

-३४९-

भास्कर लोचनगोचर होतो तेजें निजें, न अन्याच्या ।

-३५०-

मन आनन्दनिकेतन तनु ही ज्याची निरामया नित्य ।
ऐसा कोण न सुन्दर ? मदनहि त्याच्या पुढें फिका सत्य ॥

-३५१-

मरणापूर्वींच बहुशः भीरूंना मरणयातना होती ।
शूर शरीरा त्यजिती तेव्हां मृति एकदाचि अनुभविती ॥

-३५२-

मिटुनि धरा मुख जन हो डोळे ठेवा परी सदा उघडे ।
ऐसें वागे त्याचें हितचि घडे, अन्यथा अहा बिघडे ॥

-३५३-

मिताचि करूं शके नरवर दुसऱ्याचें हित महाप्रयासानें ।
अमित अनर्थ कराया होय नराधम समर्थ लीलेनें ॥

-३५४-

मित्र न दोषां बघतिल बघुनीही पाहतील लपवाया ।
बोलुनि दाविियल्याही झटतिल बहु सौम्यशब्द योजाया ॥

-३५५-

मुख नानाविद्यांचें चुंबियलें जगिं कितीक पुरुषांनीं ।
हृदयग्रहण तयांचें केलें सांगा असेल कां कोणी ? ॥

-३५६-

मुद्रणकला कलांची सकलांची रक्षिकाचि निर्मियली ।

-३५७-

मुद्रा गौरवदर्शक अंतर्गत लाघव प्रकट करिते ।

-३५८-

मैत्री शीघ्र करी जो, जो साधी सावकाश शत्रुपण।
उभयहि ते बहु दारुण सावध त्यां पासूनी रहा सुजन ॥

-३५९-

राजांना कान बहू हात तसे फार लांब असतात ।

-३६०-

रे रे रे तरुणांनों यौवन चिरकाल हें न टिकणार ।
दीर्घ असो दिन कितिही अंत तयाचा निशेत होणार ॥ १ ॥
ऐसें जाणुनि न च कां हें अपुलें चित्त शांत करणार ? ।
शाश्वत सुख सेवाया पथ हितकर हाच कां न वरणार ? ॥ २ ॥

-३६१-

लोकांच्या द्वेषातें पात्र न होणें जसें सदैव हित ।
लोकप्रिय व्हायाची हाव न धरणें तसेंचि कीं उचित ॥ १ ॥
प्रियता द्वेषास्पदता दोघीही ह्या विनाश करणार ।
आलिंगोनी पहिली दुसरी ठेंचोनियां चिरडणार ॥ २ ॥
पहिलीच्या हातांतुनि सटण्या ईप्सा धरीं न कीर्तीची ।
टाळाया दुसरीतें मति अद्रोहीं जडो तुझी साची ॥ ३ ॥

-३६२-

लोभ्यांना धन न लगे मुळींच परि हाव ती तयां फार ।
उधळ्यांना गरज बहू परि त्याविषयीं मना न दरकार ॥

-३६३-

द्वनविनिर्गतवाणी होय विलीनाचि नभांमधीं त्वरित ।
जें का लिखित परी तें राहे होवोनि वज्रलेप नित ॥

--३६४-

वय वाढतां शिशूचें पितरें आनन्द पावतीं चित्तीं ।
आयुःक्षय होतोसें पाहुनियां कां न शोक परि करिती ॥

-३६५-

वाचन मननावांचुनि पचना वांचोनियां जसें अशन ।

-३६६-

विद्या इतुकी शिकलों ऐसा मनिं दर्प पंडिता होय ।
ज्ञान किती मम कोतें ऐसा प्राज्ञास शोभवी विनय ॥

--३६७--

विद्याकुलशीलादिकगुणगणमंडितनरास पाहोनी ।
निज दुहिता विधि देई दरिद्रता त्यास योग्य वर म्हणुनी ॥

-३६८-

विद्या विनया प्रसवे परि जरि ती अविनया उपजवील ।
कवणा काय वदावें जरि जननी विष शिशूस देईल ॥

-३६९-

विसरे अपकारांतें परांचिया जो सहिष्णुता वरुनी ।
बहुमूल्यें मेळविला अनुभव तो दे स्वयेंचि टाकोनी ॥

-३७०-

व्यय आयाधिक करितां कोण न पावे दरिद्रतेस जनीं ? ।
अधिकाचि आय जयाचा व्ययाहुनी तो धनी, धनी न धनी ॥

2024e

-३७१-

शिरिं धरिला जरि नित्यचि यत्नानें सेविला बहु स्नेहें।
तरि निजकुटिलपणातें नीच न सोडी कचापरी पाहें ॥

-३७२-

शैलारोहणिं चुकतां पथ तेथुनि परतणें असे सुकर।
दुष्कर परि करणें तें अवरोहणिं जरि चुकेल मार्ग तर ॥

-३७३-

श्रीमंतांना अपुली श्रीमंती सहज लपवितां येते।
परि धनहीनांलागीं निजनिर्धनता न करुनि यत्नशतें ॥

-३७४-

श्रुतिहीना जसि वीणा, नयनविहीना जशी हरिणनयना,।
विप्राणा सुममाला जसि, कृपणा श्री तशी विफल जाणा ॥

-३७५-

संसाररूप नाटक उभयां रस भिन्न दोन दावितसे।
हसवी विवेकवंतां सहृदय जे त्यांस मात्र रडवितसे ॥

-३७६-

संसारसंगरीं जे लढती त्यां वर्म धर्म दुर्भेद्य।

-३७७-

सत्य म्हणोनिच आवड उपजो चित्तीं सदैव सत्याची।

-३७८-

समरीं धैर्यचि जय दे न आयुधें निशितही तयावीण।

-३७९-

संपत्तीचे गुण जे ते मिळवायास मानवें झटणें।
परि गुण विपत्तिचे जे त्यांची श्लाघाचि कौतुकें करणें॥

-३८०-

साच तिरस्कारास्पद तेचि तिरस्कारपर असति जे का।

-३८१-

साधनसंपत्तीची इतुकी पर्याप्ति कोण पावेल ?।
कीं कोणाहि नराच्या साह्याची गरज त्या न राहील ॥

-३८२-

सुखद न नियमें हितकर हितकर जें तेंचि नित्य सुखद परी ॥

-३८३-

सुखलाभें सुखलिप्सा न शमे ज्याची असा सुखी न सुखी ॥

-३८४-

सुचिर न कलह टिकेलाचि दोष जरी एकपक्षगामी हो।

-३८५-

सुन्दर वस्तु न सुन्दर जरि तद्दर्शन मनास ना रिझवी।

-३८६-

सेविति समवृत्तीतें त्यांचें बहुधा न सख्य जगिं असतें।

-३८७-

सोन्याला वास नसे, फळ न उसातें, न चन्दना फूल,।
दीर्घायुष्य न सुगुणा, अक्कल धात्यास कोण शिकवील? ॥

-३८८-

सोसायास विपत्ती शक्ति न, याहुनि विपत्ति ना मोठी।

—३८९—

हृदयीं चिंतितसों जें तेंही स्वर्गांत ऐकती देव।
कुविचारांना म्हणुनी तेथें द्यावा कुणीहि न च ठाव॥

—३९०—

हृन्मर्मकर्तनीं न च खलजिह्वेसारखी सुरी दुसरी।

—४००—

होतां काम कृतार्थचि त्यांतिल रस सर्वही लया जाय।

५

# त्रयोदशधारा.

———:0:———

वृत्त—अनुष्टुप्.

——:o:——

-४०१-

अगाधीं आपणा देव लोटी संकटसागरीं ।
वाटे न बुडवायातें धुवायातेंच कीं परी ॥

-४०२-

अज्ञानाची परा काष्ठा जी ज्ञानानें सगर्वता ।

-४०३-

अतिभोगें प्रजातन्त्र दारिद्र्यें राजतन्त्र तीं ।
राज्यें भूमधलीं सारीं प्रायशः नाश पावतीं ॥

-४०४-

अंतरीं विलसे शील, विलसे कीर्ति बाहिरी ।
तें स्वायत्त असे, ती तों परायत्त असे परी ॥

-४०५-

अंतीं जें करितो मूर्ख स्वयें अनुभवोनियां ।
आधीं तें करितो प्राज्ञ सुविचार करोनियां ॥

-४०६-

अन्न सेव्य स्वतोषार्थ परतोषार्थ मंडन ।

मराठी
... ग्रंथालय, ...
... शा.
ग्र. क्र. १६४४१
...

-४०७-

अन्यायार्जितवित्तानें श्रीमंती न लगे मला ।
दरिद्री राहुनी लोकीं आवडे मान लाधला ॥

-४०८-

अन्योन्यहित साधाया जायापतिपरी जरी ।
जोडा मतिविवेकांचा निर्मिला भांडतो तरी ॥

-४०९-

अन्वेषी परदोषांच्या मूर्ख पांडित्य दावितो ।

-४१०-

अहो विषय हे माना विषाहुनि भयंकर ।
तें सेविलें करी घात ध्यानमात्रेंचि ते तर ॥

-४११-

आगीचा भडका होतां ओतणें तेल तीमधीं ।
उपाय विझवायाचा सांग होईल कां कधीं ॥

-४१२-

आधीं काम मग प्रीती उपजे पुरुषांमधीं ।
आधीं ती मागुनीयां तो प्रायशः अबलांमधीं ॥

-४१३-

आनन्दरूप जो विष्णू तयाचींच शुचिस्मितें ।
जगीं पसरलीं रम्य पुष्परूपेंचि वाटतें ॥

-४१४-

आयासाविण जे वाणी कोणी वाक्पटु बोलती ।
अव्याजरमणीयत्व वानावें तें तिचें किती ! ॥

-४१५-

आरंभ चांगला होणें कार्याचा श्लाघ्य हें खरें ।
आरब्धाचा अंत होणें चांगला त्याहुनी बरें ॥

-४१६-

आरंभीं मूर्खता, अंतीं कोपाच्या अनुतापचि ।

-४१७-

आसवें म्हणती ज्यां तीं शोकाचीं मूक बोलणीं ।

-४१८-

आहे छिद्र तुझ्या पुच्छीं लेखिल्यें तुच्छ मी तुला ।
अहा चाळण कीं ऐसें बोले निन्दुनि सूचिला ॥

-४१९-

आळशांना स्वभावेंचि सर्वही अर्थ दुष्कर ।
उद्योगप्रिय जे त्यांना काय दुःसाध्य भूवर ? ॥

-४२०-

आळसाशीं घडे मैत्री बहुतांची जगामधीं ।
समर्थन परी त्याचें कुणिही न करी कधीं ॥

-४२१-

ईश्वराशीं कृतघ्नत्वें जो सदा नर वागतो ।
नरा ठायीं कृतज्ञत्व अहो दावील केंवि तो ? ॥

-४२२-

उक्तीहुनि कृती तारस्वरानें बोल बोलती ।
उक्तींची दुबळी वाणी ऐकूं ये कवणाप्रती ? ॥

-४२३-

उद्यमें बुद्धिमंतांचें बुद्धि सामर्थ्य वाढतें ।
मन्दधींचें बुद्धिमान्द्य तैसें ऊनत्व पावतें ॥

-४२४-

एकदा करुनी पाप तेंचि जो करितो पुनः ।
तया पापीं नसे त्याची जाहली पापभावना ॥

-४२५-

औषधाचें नसे ज्ञान देहाचें त्याहुनी नसे ।
परी तीं ओततो त्यांत वैद्यत्वें मिरवीतसे ॥

-४२६-

कदापि न च जोडावे मित्र देउनियां धन ।
थांबतां दान होतील अमित्र असले जन ॥

-४२७-

कधींहि नभ मेघांनीं व्यापिलें नसतें जर ।
सूर्यातपास पावोनी रमलों नसतों तर ॥

-४२८-

कर्मव्यग्रत्व हें एक शोकरोगास औषध ।

-४२९-

कवि आणि तसे वीर सवंश मज भासती ।
एक जे चिंतिती चित्तीं करुनी अन्य दाविती ॥

-४३०-

कष्टें जी साधिली विद्या हृद्य हो न कुणास ती ?।

-४३१-

कालराक्षस हा धांवे अतिवेगें पहा जरी ।
न पदध्वनिही त्याचा पडतो श्रवणीं तरी ॥

-४३२-

काळाकुट्ट असा एक विधिनें द्रव निर्मिला।
उद्भासित कराया जो जगा साधन जाहला ॥

-४३३-

किती जाणे नको ठावें जाणे काय कसें बरें ।
मानसोन्नति जाणाया ज्ञात्याची एवढें पुरें ॥

-४३४-

कित्येकां द्वेषितों कां कीं तयांना न च जाणतों ।
इच्छितों न च जाणाया कां कीं द्वेष्यचि लेखितों ॥

-४३५-

कुवर्णहि सुवर्णत्वा ज्याच्या संगेंचि पावती ।
वर्णावा त्या सुवर्णाचा जगीं या महिमा किती ? ॥

४३६

कोण्यावेळीं कुठें काय करणें योग्य आपणा ।
हें जेणें जाणतों जाणा दीर्घदार्शत्व त्या गुणा ॥

-४३७-

कोपाधीन स्वयें जेव्हां करितों आपुलें मन ।
परकीयापराधांचा भोगितों दण्ड आपण ॥

-४३८-

क्रमहीन शरीरींचा श्रम व्यायाम बोलिजे ।

-४३९-

क्षुधे दरिद्रते दोघी तुम्हीं मोठ्याच शिक्षिका ।
शिष्य विद्वान् बहू लोकीं तुमचे असती न कां ? ॥

-४४०-

खचेना धैर्य धीरांचें संकटीं, परि वाढतें ।

-४४१-

क्षुद्रलाभार्थ ही क्षुद्र सद्विपत्तीस वांछितो ।
मक्षिका त्रास वाराया कुष्ठी सूर्यास्त इच्छितो ॥

-४४२-

खलाचे ऐकणें बोल खलाचें मुख पाहणें ।
स्वयेंचि समजावें हें खलत्वाप्रति पावणें ॥

-४४३-

खलाच्या वैभवाहून मदाची वाढ वाढती ।

-४४४-

गंगा पाप, शशी ताप, दैन्य कल्पतरू हरी ।
पाप ताप तसें दैन्य साधुसंग दुरीं करी ॥

४४५

(टि. सू. सं. १५४)

गारोडी पकडी साप पाडी पकडतांक्षणीं ।
दांत त्यांचे, तशी नीती दाविती आंग्ल या जनीं ॥
जिंकलेल्यांस निःशस्त्र करुनी ठेविती अहा ।
जेते म्हणुनियां मोठा तोरा मिरविती पहा ॥

-४४६-

घडला सर्वसत्वांचा सारभूताचि मानव ।

-४४७-

जगाया जेवणें अन्न जेवाया जगणें नको ।

-४४८-

जंघेचा भंग झाल्यानें विषाद न च मानणें ।
ग्रीवा अभंग राहे हें जाणुनी मोद पावणें ॥

-४४९-

जन सांगुलिनिर्देश "हा तो, हा तो," जईं वदे ।
ऐकणें हें न कोणाच्या श्रवणास सुखास दे ? ॥

-४५०-

जन्मानेंच कुणी मोठे कुणि कर्मं करोनियां ।
मोठेपण कुणापाठीं लादिताति जगांत या ॥

-४५१-

जलांतरीं तरे नौका राहे जैं जल बाहिरीं ।
तेंचि आंत शिरे तेव्हां बुडवी तीस अंतरीं ॥

-४५२-

जाणों हें, न कळे कोणा आपुले दुबळेपण ।
स्वसामर्थ्य कळे जाणों असेही थोडके जण ॥

-४५३-

जो जसा दिसतो त्यातें तसा कोण न लेखिती ! ।
जसा परि असे जो त्यां तसा कोणी न पाहती ॥

-४५४-

ज्याच्या हर्षं मना होई समृद्धीनें परांचिया ।
समृद्धीचाच तो होय संविभागी तयांचिया ॥

-४५५-

तारांची अंगनांची ही निशा कान्तिप्रकाशिका ।

-४५६-

तोंवरी न कधीं वाटे अशोभन सुशोभन ।
तयाहुनिहि जों ये ना आधिक्येंचि अशोभन ॥

-४५७-

दक्ष जो दानदीक्षित हीनवर्ण हि तो कर ।
पावोनि शुचिवर्णातें दिसतो अति सुंदर ॥

-४५८-

दक्षतेच्या अभावानें कार्यभंग घडे असा ।
साधनांच्या न हानीनें प्रायशः तो घडे तसा ॥

-४५९-

दगडावरि शेवाळ न तया बाजतें कधीं ।
खालीं वर फिरे जो का वाहत्या पाणियामधीं ॥

-४६०-

दुर्जनावरिही पाडी प्रभा भास्कर आपुली ।

-४६१-

दुःखानुभव संसारीं आल्यावांचुनियां जरा ।
सुखाचें कायसें मूल्य कळेल कवण्या नरा ? ॥

-४६२-

देखोनी अश्रुमोक्षास नको आनन्द पावणें ।
धन्य तो आवडे ज्यास आनन्दें अश्रु ढाळणें ॥

-४६३-

देहाच्या पोषणा अन्न चित्ताच्या ज्ञान लागतें ।

-४६४-

दैन्यावसन्नमान्यांची उन्नती मंद होतसे ।

-४६५-

दोघांचा जो अहंभाव तोचि प्रणय जाणिजे ।

-४६६-

द्याया न मिळण्याहून मिळालें तें दिलें बरें ।

-४६७-

धनपूरित भांडार प्रीतिपूरित अंतर ।
दुसरें पहिल्याहूनी श्रेष्ठ मानी सुधी नर ॥

-४६८-

धुरांतुनी निघो जाळ जाळांतूनि न धूर तो ।

-४६९-

धूर्त मी इतरांहून पैशी जो धरि भावना ।
जाणावी निश्चयें तेणें ती खरी आत्मवंचना ॥

-४७०-

धैर्यवंत न तो, अंध उपेक्षी पातल्या भया ।
देखुनी तें तरे त्यास धैर्यशाली गणा तया ॥

-४७१-

न करा यौवनारंभीं त्वरा दारपरिग्रहीं ।
वार्द्धकीं तर तो त्याचा मनीं नाणा विचार ही ॥

-४७२-

न कानीं न तुम्हीं ऐका कांहींहा बोललें कुणी।
ऐकिलें तें परी सारें खरें चाला न घेउनी ॥

-४७३-

न केवळ निरुद्योगी असे जो तोचि आळशी।
तोहि तैसाचि जो वेंची क्षुद्रोद्यमिंच शेमुषी ॥

-४७४-

न भी जो मरणा त्यास तर्जनाचें नसे भय।

-४७५-

निद्रार्थी दिन हो दीर्घ शीतकालीं विभावरी।
परपीडाकरा प्रायः दीर्घायुष्य जगीं वरी ॥

-४७६-

निर्धना पाहिजे फार, लोभ्यातें सर्व पाहिजे।

-४७७-

निसर्गाच्या क्रिया सान्या चालताति हळू हळू।

-४७८-

नीतिप्रज्ञाविरोधी न ऐसा विक्रम विक्रम।

-४७९-

नीतिमान् जो शक्तिहीन कार्यक्षम न तो असे।
शक्तिमान् जो नीतिहीन तो लोकां ताप देतसे ॥

-४८०-

परपीडा घडे जेणें ऐसें सुख न सेविजे।

-४८१-

परातें दुःख देवोनी जें भोगायास लाभलें ।
अनर्थावह तें सौख्य त्याहुनी नसलें भलें ॥

-४८२-

परिश्रम करावे हा भूतीचा पथ एकला ।
तयाहुनी दुजा लोकीं असेना एकही भला ॥

-४८३-

पहिले करिती त्यांचे अपराध खरे गणा ।
उपेक्षिती तयां केल्या जे त्यांचे दुसरे म्हणा ॥

-४८४-

पिवळीं ह्मणुनी पक्व सगळीं नसती फळें ।

-४८५-

पूर्वकर्मे तुतें मातें पालखी लाभली असे ।
वससी तूं तियेमाजीं मम स्कंधींच ती वसे ॥

-४८६-

पेटतो वह्नि त्यांतून धूमजाल निघे जसें ।
पसरे कीर्ति तींतून जन्मा मात्सर्य येतसे ॥

-४८७-

पैका ज्यांचा पुरोगामी मार्ग त्यांचा न रोधिजे ।

-४८८-

पौरुषें कर्म केलें जें तें दैवें ध्वंसिलें जर ।
पौरुष ध्वंसकाचें तें जाणावें बलवत्तर ॥

-४८९-

प्रणयाच्या सवें नित्य जन्म मत्सर पावतो ।
भरतोचि तयासंगें नियमानें परी न तो ॥

-४९०-

प्रायः बहुजनायत्त कार्य सिद्धि न पावतें।

-४९१-

प्रीत हो प्रीतिपात्राचें करोनीयां प्रसादन ।
जितुकें तितुकें कृत्यें कवण्या आपुलें मन ? ॥

-४९२-

प्रेमसंदेशहरण वाटे वदनचुम्बन ।

-४९३-

( टि. सू. सं. १५४ )

फूट सर्वां जनांमाजीं, अज्ञानाचा पुरा भर, ।
दौर्बल्याची परा काष्ठा, एकमेकांत मत्सर ॥ १ ॥
आधारस्तंभ हे चार रोवुनी मुख्य त्यांवर ।
आंग्लांनीं बांधिलें भव्य हिंदसाम्राज्यमंदिर ॥ २ ॥

-४९४-

फोडिती फोल ते डोळे मृतांचे मात्र कावळे ।
चाटुकार जिवंतांना स्तवें करिति आंधळे ॥

-४९५-

बुडवी छिद्र बारीक नौका मोठीहि सागरीं ।

-४९६-

बिन्दु एकहि शाईचा महिमा थोर दावितो ।
सुविचार करायातें जनवृन्दास लावितो ॥

५

-४९७-

बुद्धिगम्यसुखास्वाद सद्गुणांचें निकेतन ।
पात्र हो सर्व दोषांचें इन्द्रियार्थोपसेवन ॥

-४९८-

बुसीतें घडवी एक दुजा कोणी बसे वरी ।
परी एक कुणी शेत कापणी भलता करी ॥

-४९९-

भीरूंच्या बसतो पाठीं, शूरांच्या शोभतो करीं।
दैवनामक जो सोटा तयाची भीति ना धरीं ॥

-५००-

भ्रूभंगें नुसत्या होय क्षत जें का हृदन्तरीं ।
तें केवळ स्मितानें ही हो विरोपित सत्वरीं ॥

-५०१-

मत्सरी निंदिती सारें असो वाईट वा भलें ।

-५०२-

मनानें चिंतिलें जें का न तें बोलून दाखवा ।
अन्यलक्षितकार्याच्या सिद्धीविषयिं वानवा ॥

-५०३-

मनापासुन मी ज्याची प्रशंसा न करूं शकें ।
तयाविषयिं कांहींही कधींहि न वदें मुखें ॥

-५०४-

मरतांना करायातें जें प्रायः नर वांछितो ।
तेंचि जो जगतांनाही करितो प्राज्ञ जाण तो ॥

-५०५-

महात्मा न करी लोकीं न साहे निकृति स्वयें ।

-५०६-

माता मातृपणा सोडी कधींहि न असें घडे ।
पावित्र्याचीच कीं मूर्ति न तिची तोड सांपडे ॥

-५०७-

मिथ्या स्तुति मनुष्यांची जो करी तो नराधम ।
स्वताच मिळवाया ती वांछी तो अधमाधम ॥

-५०८-

मुखीं हृदय मूर्खांचें प्राज्ञांचें हृदयीं मुख ।

-५०९-

मैत्री आरोग्य हीं तुल्य, त्यांची किंमत तोंवरी
न कळे, नाहिंशीं दोन्हीं झालीं नाहींत जोंवरी ॥

-५१०-

मोठें जे साध्य तें कैसें साधे सुलभसाधनीं ? ।

-५११-

मोठें म्हणुनि ना सारें चांगलें निश्चयें असे ।
सारेंच चांगलें मोठें यांत शंका मुळीं नसे ॥

-५१२-

यावें त्वां न अशी इच्छा आल्याची परवा नसे ।
संबंध तुजसी माझा रे रे मृत्यो असा दिसे ॥

-५१३-

रथारूढाचि कीं वाटे दुर्वार्ता जगिं धांवती ।
जन वंगण तेलाचें पथिं चाकांस लाविती ॥

-५१४-

रूपयौवनसंपन्न विवेकी जन दुर्लभ ।

-५१५-

रोग शीघ्रगती येती जाती मन्दगती परी ।

-५१६-

लक्ष्मीवंता अलक्ष्मीचा वियोग न कधीं घडे ।
कुगेहिनी जरी त्याच्या दुर्दैवें पदरीं पडे ॥
निर्लक्ष्मीक असाही हो लक्ष्मीप्रणय भाजन ।
सुगेहिनी जरी दैवें भूषवी तन्निकेतन ॥ २ ॥

-५१७-

वाईट वाइटालागीं म्हणतां लाभ कोणता ? ।
बहु तोटा करी चांग जें त्या वाईट बोलता ॥

-५१८-

वाक्प्रवाहपरिष्कारें गद्य ही काव्य होतसे ।

-५१९-

वाढते चिंतनें चिंता इन्धनें जेंवि पावक ।

-५२०-

विधिनें काळज्या चित्ता आपुल्या बहु लाविल्या
तेणेंचि सुखवायातें निद्रा आशाहि निर्मिल्या ॥

-५२१

विपत्ती योग्य संधी हो सद्गुणांच्या प्रकाशना ।

-५२२-

विपत्ती सोसणें हेंचि वाटे दैवास जिंकणें ।

-५२३-

विश्रांती न लगे हातां डोळियां न लगे तशी ।
जिभेला मानवांचीया बहुधा पाहिजे जशी ॥

-५२४-

विष्वङ्मध्य अमर्याद असें वर्तुल ईश्वर ।
मनेंही त्यास तर्काया क्षम कोण असे नर ? ॥

-५२५-

व्यक्तरूपा विधात्याच्या संकल्पा विश्व जाणिजे ।

-५२६-

शोक निर्व्याज तो सत्य अन्यांहीं जो न लक्षिला ।

-५२७-

श्रीनें आलिंगिल्या दृप्त न व्हावें कधिंही नरें ।
धिक्कारिल्या विषादास पावणें न तसें बरें ॥

-५२८-

श्रेयस्कर बहु सोपें साधें सरळ वागणें ।
दुःखदायक दुःसाध्य कपटाचार दाविणें ॥

-५२९-

संशयाख्य विषें सख्य मित्रांचें अंत पावतें ।

५३०

संकटें प्राप्त झालेलीं वरें निमुट भोगणें ।
जनांची त्याविषींची ना बोलणीं परि सोसणें ॥

५३१

संगती सद्विचारांची स्वभावें जडली जया ।
कधींही जन एकाकी तो लोकीं राहणें न या ॥

५३२

सद्धर्मानें विपत्ती ये जयां मानास योग्य ते ।
दैवमूलक ती ज्यांची अनुकंपेस पात्र ते ॥ १ ॥
दुर्गुणांच्या मुळें ये ती जयां त्यांसहि बोलणें ।
वाणी निष्ठुर ना योग्य संतांचें हेंचि सांगणें ॥ २ ॥
विपत्ती प्राप्त झाली जे दोषांचा योग्य दंड तो ।
दंडितांच्या दंडनानें दुष्टत्व नर दावितो ॥ ३ ॥

५३३

सन्मित्रांनीं क्षतें केलीं तरी तीं प्रेममूलक ।
वैरियांचीं चुम्बनेंही जाणावीं प्राणघातक ॥

५३४

समाधान मनींचें जें धन तेंचि अकृत्रिम ।
अतिभोगस्पृहा हेंचि जाणा दारिद्र्य कृत्रिम ॥

५३५

संपदाही दुरात्म्यांच्या शेवटीं तापदायक ।
विपदाही महात्म्यांच्या प्रायशः सुखकारक ॥

५३६

संपन्नांच्या सुखाचा तूं करिसी भंग अंतका ।
दुःखमुक्त दरिद्र्यांना वा परी करिसी न कां ? ॥

५३७

सामर्थ्याशींच संवास स्वातंत्र्याचा विराजतो ।

५३८

सुखाचा असुखाचा वा अतिरेक जईं घडे ।
सारखेंचि मनुष्यांच्या कठोरत्व मना जडे ॥

५३९

सुरक्षितपणें पाठी वाही ऐसा बरा खर ।
नको वारू वाहनार्थ जो पाडी जमिनीवर ॥

-५४०-

सोसाव्या शक्य झाल्यास आनंदानेंचि आपदा ।
निदानीं क्षुब्ध चित्तास होऊं देवूं नये कदा ॥

-५४१-

स्तविती युक्त जें त्यास आनन्दें जगतीं किती ? ।
अयुक्तचि परी ऐसें स्वयें चारित सेविती ॥

-५४२-

स्थिति उल्लंघिली जेणें अस्थैर्यी तो सदा स्थित ।

-५४३-

स्वयें निर्मल जे नेत्र त्यांत कज्जल घालिती ।
वक्र - सच्छिद्र - समल - कर्णी भूषण अर्पिती ॥

-५४४-

स्वातंत्र्य प्रज्ञताहीन केवळ स्वैरचारिता ।

-५४५-

स्वातंत्र्यवृक्ष ना वाढे केव्हांही जगतीवरी ।
पीडकांच्या न रक्ताचें केलें प्रोक्षण जोंवरी ॥

-५४६-

स्वातंत्र्य होचि राष्ट्राचें असे शाश्वत यौवन ।

-५४७-

स्वाभिमान नरा प्रेरी नयवर्त्मनिषेवणीं ।
शिष्टाचारास तो दावी परादर जरी मनीं ॥

-५४८-

स्वेच्छेनें गिळती मोठे लहानांस किती तरी ? ।
स्थळीं मानव, ते मीन राहणार जलांतरीं ॥

-५४९-

हृत्संस्कारविशेषांचा आविष्कार मनोहर ।
जो तया काव्य हें नाम देती पंडित सादर ॥

स्वस्तिक वाचनालय, नौपाडा - ठाणे

# चतुर्दशधारा.

——:o:——

## वृत्त—अभंग.

५५०

अत्यंत लहान ठिणगी असोनी । निघे तिच्यांतूनी ज्वाळा मोठी ॥

-५५१-

आमुचें साहाय्य मृतांसी न लगे । आम्हीं तयां योगें पराधीन ॥१॥
घडोघडी त्यांची गरज आम्हांसी । तयांविण कैसी गत आम्हां? ॥२॥

-५५२-

उपाशीं लागलें निजावें रात्रीस । तरी न आयास त्याचा मुळीं ॥१॥
सकाळीं उठोनी न लगे लोकांचें । ऋण फेडायाचें परी मज ॥ २ ॥

-५५३-

काम हाचि धर्म आपुला मानिती । त्यांसचि म्हणती धर्मभ्रष्ट ॥

५५४

कौलीनाचें मूळ सांपडेना कोणा । नदापरी जाणा गत त्याची ॥१॥
वाटोवाट त्यास ओघ मिळताती । कितीक ! गणती करवेना ॥२॥

५५५

खालींच जो उभा असे राहियेला । भय न तयाला पडण्याचें ॥

५५६

गुणाचिया मागोमाग । किर्ति जातसे सवेग ॥ १ ॥
टाकी पुढतीं पाउलें । नर छाया मागें चाले ॥ २ ॥

५५७

चांगुल्याची इच्छा वाइटाची भीती । चित्ता प्रवर्तिती दोघीजणी॥

-५५८-

जन्म मानवाचें मनन कराया । तैसें आचराया मनःपूत ॥ १ ॥
उभय हीं कर्मे केलिया वांचून । मानवत्व ये न मानवास ॥ २ ॥

-५५९-

जन्मलेल्यांचें जीवित । वाऱ्यामाजीं दीपज्योत ॥

-५६०-

जन्म श्वासाचा आगम । मृत्यु तयाचा निर्गम ॥

-५६१-

जो का दीना लागीं देई धनदान । खास त्याचें ऋण देव लागे ॥

-५६२-

दुजियानें केला अल्प उपकार । तयाचा विसर नसो कधीं ॥ १ ॥
उपकार कोटी केले दुज्यावरी । नसावी अंतरी आठवण ॥ २ ॥

-५६३-

दुःखहानीसाठीं खटाटोप करी । सुधी कोण वरी सुखलाभ ? ॥

-५६४-

दुष्टातें न दण्डी जरी दण्डधर । करी अपकार सज्जनांचा ॥

-५६५-

धनवंत होती परवंत साचे । धनलोभियांचे मुळें जगीं ॥

-५६६-

निर्धन वांछिती अन्न उदरार्थ । सधन अन्नार्थ उदराचि ॥ १ ॥
ज्यांस एक आहे त्यांस दुजें नाहीं । लीला विचित्र ही देवा तुझी॥२॥

-५६७-

पापराक्षसाचीं आयुधें बहुत । मूठ तीं अनृत सर्वां एक ॥

५६८

पुरुषांचे दोष प्रायः स्वार्थमूल । दुर्बलतामूल योषितांचे ॥

५६९

बळ बळवंता तरीच भूषण । करी संरक्षण दुबळ्याचें ॥

५७०

बोलावें त्याहून दुप्पट पहावें । जगतीं मानवें म्हणुनियां ॥ १ ॥
दिले दोन डोळे परी जीभ एक । विधात्यानें देख निर्मियेली ॥२॥

५७१

महात्म्याचें मोठेपण । असे परप्रयोजन ॥

५७२

वाचकाचा वेळ घेउनी अत्यल्प । ज्ञान दे अनल्प तयालागीं ॥ १ ॥
जाणावा कुशल ऐसा ग्रन्थकार । महा उपकार करीतसे ॥ २ ॥

-५७३-

विचारांस रूप न ये आचारांचें । तोंवरी तयांचें काय फळ ? ॥१॥
कितिही चांगले असले ते जरी । स्वप्नांचिया परी निष्फळचि ॥२॥

-५७४-

वित्तनाशाहुनी मित्रनाश हानि । दुःसह त्याहुनी धैर्यनाश ॥

-५७५-

वैरनिर्यातन वैऱ्याचें करील । तत्सम होईल केवळ तो ॥ १ ॥
जो का उपेक्षील त्याचे अपकार । श्रेष्ठ तो साचार तयाहुनी ॥२॥

-५७६-

शब्दसंपत्तीची असोनी समता । कवींची कविता भेद पावे ॥१॥
गूळ-साखरेची रुचि किति भिन्न । उभयीं समान इक्षुजत्व ॥ २ ॥

-५७७-

शरीर श्रीमंत मनानेंचि होतें ।

-५७८-

शिला खालीं फेंकी आयासावांचून । डोंगरावरून दुबळा ही ॥१॥
परी ती पडतां आडवाया तीस । शक्ति कवणास आहे सांगा ॥२॥

-५७९-

शीघ्र करितसे जो अर्थनिर्णय । होई अनुशय शीघ्र त्यास ॥

-५८०-

शुक्ल पक्ष दोन्ही संचरे मेदिनी । तैसाचि गगनीं रात्रिंदिन ॥ १ ॥
सदा मीन सेवी स्थाणुशिरीं बसे । सकलचि असे सर्वकाळ ॥२॥
ऐसे बकाठायीं चांदोबाचे गुण । असति अनून अधिक ही ॥ ३ ॥
अहा बक ढोंगी जगतीं या निन्द्य । चन्द्र होय वंद्य सर्वांसही ॥४॥
गुण मान्य होती स्थानविशेषानें । योग्यस्थानाविणें निष्फळ ते ॥५॥

-५८१-

शुभ प्राप्त झाल्या उद्यमा स्तवितों । दैवास निंदितों अन्यथा हो ॥

-५८२-

संशयविषाची बाधा जाहलीसे । हृदयीं त्या वसे प्रेम कैंवी ? ॥

-५८३-

सज्जनांचे सत्त्व स्तुतीनें दुणावें । दौष्ट्य वृद्धि पावे दुर्जनांचें ॥

-५८४-

सधन ग्रासिले भयानें सकळ । निर्धन विव्हळ शोकें केलें ॥

-५८५-

संपदेनें मूर्ख नाश पावताती । होय सुज्ञांना ती भीतिप्रद ॥

--५८६--

सर्व तीर्थांमाजीं श्रेष्ठ धारातीर्थ । मरे नर जेथ नरासाठीं ॥

-५८७-

सर्व सुखांहुनी दुःखच मधुर । मना वाटे फार स्नेहमूल ॥

-५८८-

सामर्थ्य वाणीचें स्त्रियेचीया परी । पुरुषाची सरी कर्मयोगा ॥

--५८९-

सुखाचा न लाभ दुःखाचीच हानि । साध्य हें मानोनी सुधी रमे ॥

-५९०-

सुजनत्व अंगीं बाणल्यावांचून । सुकवित्व कोण जन पावे ? ॥

-५९१-

सोनियाच्या केल्या जरिही शृंखला । कोण घालायाला होय राजी ॥?

-५९२-

सोनियाच्या राशीवरि बैसलासे । व्याकुळ झालासे क्षुधायोगें ॥ १ ॥
अर्थसंग घडे निर्लेप जो परी । धन्य तो संसारीं कृपणचि ॥ २ ॥

-५९३-

स्वसुतें तुजला वाटतें सेवावें । पितयातें भावें सेवीं तरी ॥ १ ॥
पूर्वज आपुले वंद्य आपणास । जरी वंशजांस वंद्य होणें ॥ २ ॥
सकलांचा पिता परमेश एक । त्याहुनी आणिक सेव्य कोण ? ॥ ३ ॥

# पञ्चदशधारा.

——:o:——

वृत्त—ओंवी

—५९४—

अंगीं गुण जे बाणणार । यौवनामाजीं साचार ।
दिसती तयांचे अंकुर । शैशवींच ॥

—५९५—

अनर्थ बहुत एकवटले । त्यांसी एकची नाम दिलें ।
निवडोनियां सुजनीं भलें । आळस ऐसें ॥

—५९६—

अनेक सुदांहीं मिळून । शिजाविलें जें असे अन्न ।
तें प्रायः गुणविहीन । असायाचें ॥

—५९७—

अमान्य जे त्यां देई मान । ऐसा जो का जन अजाण ।
तो मानाचा अपमान । करी वाटे ॥

—५९८—

अल्प दोष जडतां अंगीं । अनल्पांचि आणिती वेगीं ।
म्हणोनि न दोषासंगीं । प्रवर्तावें ॥

—५९९—

अहा वह्नी विझाल्यावर । राखेंत घालोनि फुंकर ।
पेटवूं शके कवण नर । दीप तेथें ॥

—६००—

आनन्दातें द्विगुण करी । शोकाचा हो वाटेकरी ।
सौख्य वाढवी दुःख हरी । सखा जो का जिवींचा ॥

-६०१-

आवडे तें ज्यास बोलणें । तेणें नावडे तें ऐकणें ।
सर्वदाही चित्तीं ठेवणें । वक्तृजनीं ॥

-६०२-

आळस हें महापातक । स्वयेंचि जाणा निःशंक ।
तयापासुनि बहुत आणिक । निपजताती ॥

-६०३-

इतरांसी दान देतां । प्रीत व्हावें मनीं तत्त्वतां ।
लाजावें परी स्वयें घेतां । तयांपासुनी ॥

-६०४-

ऋण लागसी जें तूं ज्याचें । फेडीं आधीं तें तयाचें ।
उरलें काय मग स्वताचें । जाणशील ॥

-६०५-

करावया ग्रंथनिर्माण । वांछी जो का कुणी जन ।
तेणें ग्रंथांचें अध्ययन । प्रथम कीजे ॥

-६०६-

कांहीं केवळ आस्वादावे । कांहीं बकाबक गिळावे ।
थोडेच चावुनी जिरवावे । ग्रंथ ऐसे ॥

-६०७-

गगन आणि महीतल । वनें आणि मार्ग सकल ।
यांत सांठले बहुल । ज्ञान तेंवि उपदेश ॥ १ ॥
जिज्ञासा वसे जयांच्या मनीं । विवेकयुक्त ज्यांची करणी ।
प्राप्त होती तयांलागुनी । दोन्हींही ॥

-६०८-

गानांबुधीचें करितां तरण । होवो त्यांत न निमज्जन ।
वाटे वक्षःस्थळीं म्हणून । तुंबी वाहे शारदा ॥

-६०९-

गूढ ऐशीं जीं कारणें । अशक्य जयांतें तर्किणें ।
तयासचि नांव देणें । दैव ऐसें ॥

-६१०-

जयावरी फळें चांगलीं । बाजती ना कदाकाळीं ।
तो तरू जाळिती अनळीं । इन्धनत्वें॥

-६११-

जीवितक्षण एकैक । जैसा जैसा जाय देख ।
तैसा तैसा जवळीं अंतक । येत असे ॥

-६१२-

जें ठावें आपणास । अत्यल्प तें असे खास ।
जें न ठावें तयास । पार नाहीं ॥

-६१४-

जें न लगे आपणातें । विकत घेई मूढ जो तें ।
विकणें प्राप्त होय त्यातें । अवश्य जें का॥

-६१५-

जें नसे आपणापाशीं । इच्छितो तें मिळवायासी ।
अहा उपजवी वैरस्यासी । प्राप्त जें का ॥

-६१६-

जो का कांहींच नेणें । तया शंका कैची येणें ?।
ज्ञानापोटींच होणें । जन्म तिचें ॥

-६१७-

जो दुजियापासुन । अनुग्रहाचें करी ग्रहण ।
गमावी तो आपुले आपण । स्वातंत्र्यचि॥

-६१८-

ज्याच्या अंगीं असे शक्ति । तरी क्षमा बाणे चित्तीं ।
तयासचि क्षमी म्हणती । तत्त्वदृष्ट्या ॥

-६१९-

दक्षिणहस्तें जें कीजे । तें वामें न जाणिजे ।
ऐसी रीती आदरीजे । साधुजनीं ॥

-६२०-

दैन्यांत घालवी जिवंतपण । धनराशींत पावे मरण ।
पराकाष्ठेचें मूर्खपण कृपणाचें ॥

-६२१-

नव कल्पनांची निर्मिति । जितुकी दुष्कर मानिती ।
तितुकी परनिर्मितांची उक्ति । योग्य शब्दें ॥

-६२२-

परदोषांच्या पर्यालोचनें । स्वदोषांतें दूर करणें ।
लक्षण एक हेंचि जाणें । धीमंतांचें ॥

-६२३-

प्रतिभा आणि बुद्धि । बहुत अंतर यांमधीं ।
एक पथ दावी आधीं । दुजी तया अनुसरे ॥

-६२४-

प्रथम कोपुनी लोकांवरी । मागाहुनी कोप आंवरी ।
कुपित कोपाचि तेव्हां वरी । आपुल्या ठायीं ॥

-६२५-

प्रयासें जें मेळविजे। तें रसें उपभोगिजे।
अनायासें जें पाविजे। त्यांत गोडी असे ना ॥

-६२६-

प्रौढपणाचा आला आळ । झालों बाळांहूनि बाळ ।
सदा सर्वदा खेळ खेळतों । निःशंकपणें ॥ १ ॥
जीविताचें करुनि खेळणें । वाटेल तसें त्यासी खेळणें ।
आर्धी, मग तें टाकोनि देणें । योग्य हें कां ? ॥२॥

-६२७-

बहुमूल्या प्रिया वाणी । तिचा महिमा कोण वर्णी ।
अहो तियेच्या निष्पादनीं। मोल न लगे मुळींच ॥

-६२८-

भक्ष्यातें पुढतीं खाती । मागुनी त्या ओरबाडिती ।
मांजरा सारखी रीती तोंडपुजांची ॥

-६२९-

भाषणामाजीं नसो खोली । लांबी जरी का वाढविली।
तरी वक्तृत्वाची शैली । उत्तम ठरे ॥

-६३०-

मिषाची वा मंडनाची। अपेक्षा ती नसे साची ।
सारल्य जें का तयाची। रीत ऐशी ॥

६३१

लावण्यनामें सुनिर्मल। कुसुम सौन्दर्यें निस्तुल।
सद्गुण त्याचा परिमल। दरवळे तो दिगन्तीं॥

-६३२-

वचनें सौम्य बोलोनियां । चरितें स्थिर आचरोनियां।
प्रकट करी सत्त्व जगीं या । समर्थ जो का ॥

-६३३-

विचाराचा आविष्कार । तोचि वाणी साचार ।
अन्तःस्थ वाणीस विचार । ऐशी संज्ञा ॥

-६३४-

सत्यापरी सौन्दर्याची । अखंड शोभा झळके साची ।
नसे जरी मंडनाची । जोड तया ॥

-६३५-

सोशिल्यावीण परकृतनिकृति । प्राप्त व्हावी आपणा शान्ति ।
म्हणोनिच युद्धांप्रति । स्वीकारावें ॥

-६३६-

स्वयें राहोनि अज्ञात । सर्व जाणीन हा हेत ।
असेल चित्तीं तुझ्या वसत । तर वस नगरीमाझारीं॥

-६३७-

हसणारांसह हसावें । रडणारांसह रडावें ।
सहानुभूतीनें वागावें । इतरांशीं ॥

# षोडशाचषक

——:0:——

## पद्यें.

——:0:——

-६३८-

अधिक सुखाचा हव्यास। न धरी तोच सुखी खास ॥

-६३९-

अनल्प चित्तीं चिंतावें। अल्पचि वाचे बोलावें ॥१॥
त्याहुनि अल्पतर स्वकरें। नरें लिहावें जपुनि बरें ॥२॥

-६४०-

( चाल—भूपती खरें तें— )

अनुतापयुताचें सान्त्ववचन नादरितो।
न च पाप दुज्याचें झांकाया जो सजतो ॥ १ ॥
न च परापराधक्षमा कधींही करितो।
जगिं सकळ खळांचा गणाचि अग्रेसर तो ॥ २ ॥

-६४१-

अपार विश्वींचा संसार्। शुभाशुभहि त्यामधीं अपार् ॥

-६४२-

अरुंद उगमीं कीर्तिनदी। दूर तिची वाढे रुंदी ॥

-६४३-

( चाल—चरपटपंजरींची. )

अशुभ न करणें फार चांगलें। तें न चिंतिणें त्याहूनि भलें॥

-६४४-

( फटका )

आरोग्या तूं प्राप्त जाहल्या पावायाचें काय उरे ? ।
तूं न पावल्या काय पावलें ? सांग अभीप्सित मजसि खरें ॥

-६४५-

आहे कां सौराज्य असें । कोठें तरि भूवरि खासें ? ॥ १ ॥
स्वयें नृपति जेथें दास । जन भोगी स्वातन्त्र्यास ॥२॥

-६४६-

( चाल-चरपटपंजरीची )

इतरांमधले गुण हुडकावे । दोष आपणांतिल निवडावे ।

-६४७-

( चाल-सदर )

उपदेशाचे बोल मनोहर । नसती प्रायः मानवहितकर ॥

-६४८-

(चाल—नंदनवन देवीनें. )

कठिण समय हा गुरू गुरूंचा
ऐसें जन वदती ।
गुरुतर परि या द्यावी लागे
गुरुस दक्षिणा ती ॥ १ ॥
त्यामानानें शिक्षण हितकर
सर्वथा न होतें ।
भाग सोसणें गुरु व्यथेला
त्या पायीं पडतें ॥ २ ॥

-६४९-

कर्म एक केलें त्याचें । तेंचि जाणिजे फल साचें ॥ १ ॥
कीं उपजे साधायातें । शक्ती दुजिया कर्मातें ॥ २ ॥

-६५०-

कला कशाला ती व्हावी । जींवर वृत्ति न चालावी ? ॥

-६५१-

कल्पकता धी तरुणांची । विवेकिता धी वृद्धांची ॥

-६५२-

( चाल—चरपटपंजरीची. )

काय करावें तें ठरवावें । जें ठरलें तें ठाम करावें ॥

-६५३

( अंजनीगीत. )

कोप प्रकटे पुरुषवचानें । शोक डोळियांतील जलानें।
केलि केलिया कळे स्मितानें । प्रीति चुंबनांहीं ॥

-६५४-

गोड कितीही भक्ष्य असो । तत्सेवनिं अतिरेक नसो ॥ १ ॥
उदर जीभही त्या विटते । थोड्यांतचि गोडी असते ॥२॥

-६५५-

चालेल कोण चिरकाल । ज्याची मन्द नसे चाल ? ॥१॥
चाल हळू जीवितमार्गीं । ना तरि यम नेइल वेगीं ॥ २ ॥

-६५६-

जईं कोपे तईं कुजन । वदन उघडी मिटी नयन ॥

-६५७-

जे जगती त्यांच्या हृदयीं जे वसती।
मृत झाले तरि ते मरति न जागीं जगती॥

-६५८-

जेथ मिळेना मधुचें पान्। तेथ नसे मधुपाचें गान्।

-६५९-

तरुण असते जाणते। जरठ असते शक्त ते।
तर न कांहीं राहतें। अकृत करणें योग्य तें॥

-६६०-

( चाल—पतितपावन नाम० )

तरुणपणीं जे ज्ञानिपणानें वृद्ध बहु दिसती।
फार दिवस ते जगतिं न जगती लोक असें वदती॥१॥

-६६१-

( फटका )

तरुणपणाची छटा गुलाबी जाइल लौकर विलयाला।
अजरामर परि सद्गुण राहिल ठाव देइं हृदयीं त्याला॥

-६६२-

( चाल—चरपटपंजरीची. )

तितुका भयद न शत्रु जाणिला॥जितुका वाटे मित्र शंकिला॥

-६६३-

थोर करी उपकार। थोर तोचि कीं फार॥

–६६४–

दान शोभवी हस्ताला । सत्य शोभवी कंठला ।
शास्त्र शोभवी कर्णाला । अन्यभूषणें काशाला ? ॥

--६६५–

( चाल--पतितपावन. )

दारूच्या पेल्यांत बुडाले आजवरी जितुके ।
अंबुनिधीमधिं नसतिल मेले बुडुनीयां तितुके ॥

--६६६–

( अंजनगीत )

दीप मालवे अति तेलानें । वह्नि विझे अतिरिक्त इन्धनें ।
तसें नराचें अत्यशनानें । बिघडे आरोग्य ॥

–६६७–

( चाल—अंबरगत परि० )

दुर्मिळ म्हणुनी स्तुति बहुमूल्यचि रत्न-कांचनापरी ।
व्यर्थाचि वेंचु नका ती तरी ॥

--६६८--

देव कधिंहि वैद्याचाणी । माराया ठार न हाणी ॥ १ ॥
लावाया योग्यचि वळण । पितयापरि ताडी जाण ॥ २ ॥

–६६९–

( फटका )

देहपात ज्यामधीं होतसे असा समरही बहुत बरा ।
पौरुषहानि परी जीमाजीं अशी शान्ति न च कधिंहि वरा॥
दुष्ट अरींच्या निशितशरांनीं भेदुनि घेणें बरें उरा ।
खलापुढतिं न च वांकविणें हो कधिंहि परी आपुल्या शिरा ॥

-६७०-

( चाल --पतितपावन नाम. )

द्यूतसंग नांवाचा आत्मज सुप्रिय लोभाचा ।
अनयाचा जो सख्खा भाऊ जनक विपत्तीचा ॥

-६७१-

( चाल — चरपटपंजरीची. )

धवल करितसे केशकलापा । जरा नराच्या परि न च पापा ॥

-६७२-

धैर्यावांचुनि सत्य नसे । सत्यावांचुनि धर्म नसे ॥

-६७३-

( चाल-चरपटपंजरीची. )

निश्वास प्रणयाचा पहिला । जो प्रज्ञेचा तो शेवटला ॥

-६७४-

न्यायातें प्रिय नर गणिती । दया स्त्रियांची आवडती ॥
समगुण ते निष्ठुरतेनें । तैशा त्याही मृदुतेनें ॥ २ ॥
बल पुरुषां विधिनें दिधलें । स्त्रियांस रूपें भूषविलें ॥३॥
नर वचनें प्रत्यय पटवी । स्त्री बोलुनियां मन रिझवी ॥ ४ ॥

-६७५-

( चाल — चरपटपंजरीची. )

प्रतिभाशाली न च बहु नसती । विकलत्वें परि मूकचि बसती ॥

-६७६-

भारतीय मी जन्मानें । भारतीय मी कर्मानें ॥ १ ॥
भारतीय मी मरणार । जन्म भारतिंच घेणार ॥ २ ॥

-६७७-

( चाल चरपटपंजरीचा. )

भीरूंना भय दुःखद जितुकें। मरणहि धीरांना न च तितुकें ॥

-६७८-

मानव तेंचि करी। जें त्या शक्य असे।
ईश्वर तेंचि करी। जें तो इच्छितसे॥

-६७९-

( चाल--पतितपावन. )

मानवलोकीं देवलोकिचें असेल जर कांहीं।
गन्धर्वांची विद्या केवळ दुजें किमपि नाहीं॥

-६८०-

रूपवती स्त्री रत्नसम। शीलवती परि निधि परम॥

-६८१-

लाभ ही। हानि हो। कीर्तिनाशें।

-६८२-

वाङ्मय जितुकें प्रकाशिलें। त्याहुनि अधिक जयें लिहिलें॥
जितुकें लिहिलें तयाहुन। असे अधिक ज्याचें पठन॥
चिन्तन पठनाहुन ज्याचें। बहुतचि आहे कीं साचें॥
कृतार्थ नच जरि तो झाला। पात्रचि यश भोगायाला॥

-६८३-

विद्या झडकरि वरि मनुजा। प्रज्ञा करि परि बहु गमजा॥

-६८४-

व्यतिरेकानें दुःख जसें। अतिरेकेंही होय तसें॥

-६८५-

व्यसनततीचा विसर पडावा । तत्कृत बोध न परि विसरावा ॥

-६८६-

( अंजनीगीत. )

शमवायातें भूक तहान । थंडी वारा आणि ऊन ।
लागे त्याहुनि वेंचितसों धन । पेटीस्तव अधिक ॥

-६८७-

सत्कर्माच्या कीर्तिहुनी । दोषांची अपकीर्ति जनीं ।
अधिकचि बहुधा पसरतसे । म्हणुनी टाळा दोष कसे

-६८८-

( फटका )

सत्कविसूक्तिरसायन पावन सुरसरितेच्या जलाहुनी ।
प्रियपत्नीच्या अधरसुधेहुनि अधिक मधुर मी त्या मानीं ॥
दोहोंहुनिही क्रमनाशन हें समाधिक ऐसें मनिं गणुनी ।
भवरोगातें दूर कराया तेंचि सेवितों दिनरजनीं ॥

-६८९-

सद्वृत्ती गुणवंताची । खलमतिनें न ढळे साची ॥
शिखा रत्नमय दीपाची । वात्येनें न विझायाची ॥

-६९०-

( फटका )

संतोषातें बहुधा न रुचे संपन्नांचा सहवास ।
गुणगणमंडितविपद्गतांचा अनुचर होई तो खास ॥

-६९१-

सुखसंगी जन दुःखविभागी ।

-६९२-

हार सुगुण कंठीं धरिती । पायिं पैंजणें निर्गुण तीं ॥

-६९३-

हेमपरीक्षा निकषानें । मनुजपरीक्षा हेमानें ॥

# सप्तदशधारा

-६९४-

## जन्मलेल्या बालकास

वृत्त–रथोद्धता

बालका जगतिं जन्मतांक्षणीं
तूं स्वयें रडसि दुःख पावुनी।
जन्मुनी हसविसी परी जनां
सौख्य देवुनि तयांचिया मनां ॥ १॥
या जगीं जगुनियां अशी कृति
तूं करीं सतत कीं तयाप्रति।
सोडितां स्वमुखिं हास्य राहिल
लोक सर्व रडतील केवळ ॥ २॥

---

-६९५-

## स्वगेहप्रेम.

——:o:——

वृत्त–उपजाति.

असोत नानाविध रम्य भोग। हर्म्यें रहायास मिळोत चांग।
स्वगेह सोडोनि दुज्या ठिकाणीं।पावोनि ते तींहि रमे न कोणी॥
नसो स्वताचें गृह वासयोग्य। तया परी वस्तु न अन्य भोग्य।
नांदे तिथें नित्यचि दिव्य कांति।जी शोधितांही न मिळे दिगन्तीं॥
मद्धाम जें सद्म दरिद्रतेचें। गमे मला मन्दिर इन्दिरेचें।

अमंद आनंद तिथेंचि जो हो।स्वर्गींहि इन्द्रास मिळेल कां हो ॥
मनोहराही परकीय भूमि । मानीं जणों ही मृगतृष्णिका मी ।
प्रभो पुनः पर्णकुटी स्वतांची ।लाभेल केव्हां मनिं आस हेचि ॥
पूर्वीपरी प्रांगणपादपांच्या । शाखांवरी पंक्ति विहंगमांच्या ।
बैसोनि केव्हां बहु गोड गाणीं।गातील माझी परिसोनि वाणी ॥
तें गेह ते पादप, धेनु त्याच, । विहंग ते, खळगडोहि तेच॥
तेथील सारेंचहि तेंच तेंच । मिळो मना स्वास्थ्य पुनः हि तेंच ॥

–६९६–

## शारदेस

राग–मुलतानी, त्रिताल

तव वास शारदे वरदे । जिह्वाग्रीं माझ्या असुं दे ॥ ध्रु० ॥
मोह झाडुनी मन माझें अजि । रमलें तव गुग गानीं
भारति माते मान्द्य दूर कर । ओत विपुल रस कवनीं ॥
कर्कशकाष्ठो-दरामधुनिया । द्राक्षा निपजति न च कां ? ॥
छिद्रितवंशामधुनि न येती । मधुरध्वनि कानीं कां ?
मद्वचनांतुनि श्रुतिपुटपेया । गळो सुधा वाग्रूपा ।
स्वकृतानंदें रसिकजनांच्या । शमवो संसृतितापा ॥

---

–६९७–

## सर्प.

चाल––हे मना । सोड कल्पना ३० ।

रे फणी! दूर सर झणीं!
मिरविसी जनीं
फुगुनि गर्वानें ।
कीं भेकगणा टाकिसी गिळुनि लोलनें ॥

तुजपरी नीच कुणि तरी
असे कां ? खरी
रीत तव न्यारी
वद कवण पवनभुक् निरपराधियां मारी ? ॥

काननीं वससि [illegible]र्नीं
परी देखुनी
तुला घाबरती
जन पुढें न सरती जीव घेउनी पळती ॥

व्यापिलें बीळ पर भलें
तेथ दाविलें
स्वबळ दुबळयांतें
न च शौर्य गाजविसि नकुळकुळीं कां परतें ? ॥

कुटिल तूं नैकजिह्व तूं
भोगलुब्ध तूं
स्वभावें असली
दे दूध तयासहि पाय लागतां डससी ॥

---

-६९८-

## घटास.

( वृत्त—उपजाति. )

जे घालिती फास तुझ्या गळयातें । कूपामधें लोटिति तेंवि तूंतें ।
गड्या घटा तोषविसी तयांस । देवोनियां निर्भर जीवनास ॥
घेसी परांचे गुण सान थोर । कधीं न त्यांचा करिसी अव्हेर ।
तूं नीरसांना रस चाखवीसी । रे लाजवीसी रसिकाग्रणींसी ॥
पयोधरींचया मधुरा पयात । पिऊनि आनंद जसा शिशूनें ।

तशा त्वदन्तर्गतह्री पयाला । पिऊनि हो तोष पिपासिताला ॥
शिरीं करीं आणि कडेवरीही । शिशूपरि खेळविती तुलाही ।
कितीक नारी ! प्रिय तूं तयांना । हें भाग्य कैचें इतरां जनांना ? ॥
आरंभितां मंगल कार्य कांहीं । त्वत्स्थापनेतें करिती स्वगेहीं ।
तुझ्या मुखीं श्रीफल ठेविताती । नानाप्रकारें तुज पूजिताती ॥
परी कुणाचें फुटतां कपाळ । हा हा तुझा येत विनाशकाळ ।
मरो कुणी स्फोट तुझा तरी तो । ही रीत सारा जन आदरीतो ॥
सद्वृत्ततेचें गुणशालितेचें । होई न लोकीं जरि चीज साचें ।
पुण्यप्रभावें तुज पुत्र झाला । प्रताप जेणें बहु गाजवीला ॥

---

-६११-

## टीकाकार.

--:o:--

### वृत्त—ओंवी.

अतिदुर्बोध ऐसें वचन । सोडोनि देती स्पष्टार्थ म्हणून ॥
सुबोध वाक्या विस्तारें करून । विवरीती ॥
योजिती समासांच्या पंक्ति । वागाडंबर वृथा दाविती ॥
अस्थानीं भ्रम उपजवीती । वाचकजनीं ॥
टीकाकार ऐसे फार । पांडित्य करिती अपार ।
जाणिती न मूळाचें सार । स्वयेंचि परि ॥
ऐशी टीका वाचवाचुन । वाचकांचें समाधान ।
नच झालिया अजाण । ठरती तेचि ॥

---

-७००-

## देव जांवई.

राग—ललित, त्रिताल.

मद्वदनींची जर ही वाणी। तव हृदया प्रभु पाझर नाणी ॥
कां मग सदनीं वससी तिचिया। दिवसा रातिंहि मम हृदयीं या ॥
राहे जवळीं प्रेमानें परि। पति दयितेप्रति जर आव्हेरी ॥
मरणाहुनि तें मानवतींना। दुःखद वाटे सुवासिनींना ॥
मद्वाणीवर निज मन जडवीं। जडहि आपुल्या तेजें जगवीं ॥
सजीव करुनी रत हो इजसी। धन्यचि करिं मज ततिपतयासी।

-७०१-

## प्रबोधन.

—•—

( राग-पहाडी, धुमाळी )

करुं आजि सारे जूट। भंगोनि टाकूं फूट
पडेल कैंची तूट वदा मग जगतिं आपणास्?
हा ! दुबळे संख्यातीत। भांडतों आपअपसांत ॥
शांती पुष्टी तुष्टी यांचा। घात करितसों ॥ २ ॥
अपुलें तें स्वीकारावें। परक्याचें वर्ज्य करावें।
ग्राह्याग्राह्यविवेक करी त्या संपदा वरी ॥ ३ ॥
भोगिती स्वीय, न च घेती। परकीय, प्रभु त्यां वदती।
तदन्य सारे दास अथवा चोर ते खरे ॥ ४ ॥
नच आपण ऐसे व्हावें। न स्वत्व कदा सोडावें।
स्वत्व सोडितां सत्त्वहीन नर नाश पावतो ॥ ५ ॥

तशा त्वदन्तर्गतही पयाला । पिऊनि हो तोष पिपासिताला ॥
शिरीं करीं आणि कडेवरीही । शिशूपरि खेळविती तुलाही ।
कितीक नारी! प्रिय तूं तयांना । हें भाग्य कैचें इतरां जनांना ? ॥
आरंभितां मंगल कार्य कांहीं । त्वत्स्थापनेतें करिती स्वगेहीं ।
तुझ्या मुखीं श्रीफल ठेविताती । नानाप्रकारें तुज पूजिताती ॥
परी कुणाचें फुटतां कपाळ । हा हा तुझा येत विनाशकाळ ।
मरो कुणी स्फोट तुझा तरी तो । ही रीत सारा जन आदरीतो ॥
सद्वृत्ततेचें गुणशालितेचें । होई न लोकीं जरि चीज साचें ।
पुण्यप्रभावें तुज पुत्र झाला । प्रताप जेणें बहु गाजविला ॥

---

-६९९-

## टीकाकार.

--:o:--

### वृत्त—ओंवी.

अतिदुर्बोध ऐस वचन । सोडोनि देती स्पष्टार्थ म्हणून ॥
सुबोध वाक्या विस्तारें करून । विवरीती ॥
योजिती समासांच्या पंक्ति । वागाडंबर वृथा दाविती ॥
अस्थानीं भ्रम उपजवीती । वाचकजनीं ॥
टीकाकार ऐसे फार। पांडित्य करिती अपार ।
जाणिती न मूळाचें सार । स्वयेंचि परि ॥
ऐशी टीका वाचवाचुन। वाचकांचें समाधान ।
नच झालिया अजाण । ठरती तेचि ॥

---

-७००-

## देव जांवई.

राग—ललित, त्रिताल.

मद्वदनींची जर ही वाणी। तव हृदया प्रभु पाझर नाणी ॥
कां मग सदनीं वससी तिचिया। दिवसा रातिंहि मम हृदयीं या ॥
राहे जवळीं प्रेमानें परि। पति दयितेप्रति जर आव्हेरी ॥
मरणाहुनि तें मानवतींना। दुःखद वाटे सुवासिनींना ॥
मद्वाणीवर निज मन जडवीं। जडहि आपुल्या तेजें जगवीं ॥
सजीव करुनी रत हो इजसी। धन्यचि करिं मज तत्पितयासी।

---

-७०१-

## प्रबोधन.

—०—

( राग-पहाडी, धुमाळी )

करूं आजि सारे जूट। भंगोनि टाकूं फूट
पडेल कैंची तूट वदा मग जगतिं आपणास्?
हा! दुबळे संख्यातीत। भांडतों आपअपसांत ॥
शांती पुष्टी तुष्टी यांचा। घात करितसों ॥ २ ॥
अपुलें तें स्वीकारावें। परक्याचें वर्ज्य करावें।
ग्राह्याग्राह्यविवेक करी त्या संपदा वरी ॥ ३ ॥
भोगिती स्वीय, न च घेती। परकीय, प्रभु त्यां वदती।
तदन्य सारे दास अथवा चोर ते खरे ॥ ४ ॥
नव आपण ऐसे व्हावें। न स्वत्व कदा सोडावें।
स्वत्व सोडितां सत्त्वहीन नर नाश पावतो ॥ ५ ॥

-७०२-

## साम्यभ्रम.

—:o:—

( राग—बागेश्री, त्रिताल. )

समतेनें जरि सख्य घडे । तुझें मजसि मग कां बिघडे? ।
तूं निर्गुण हें वदे श्रुति । मजही निर्गुण जन वदती ॥
परं धाम तव शून्य असे । न च कां माझें ही तैसें ? ॥
तुजपरि मी हर दिगम्बर । भूति वेंचितों भैक्ष्यपर ॥
तूं हतकाम तसा मी ही । मैत्री कां अपुली नाहीं ? ॥
हा हा मोह मना जडला । म्हणुनि दास हा हें वदला ॥
वीतराग तूं मी रागी । कुणि हि न जरि विषयां भोगी ॥
शिवा असासि तूं परम शिव । शिव शिव परि मी किति अशिव !

---

-७०३-

## विरक्ताचा शृंगार.

( चाल—धांव पाव सावळे इ. )

ही वनवीथी बहुत मनोहर रमवितसे मन्मना ।
भृंगगणाच्या मंजु गुंजनीं सुरस करी गायना ॥
ह्या रमणीचे पृथुल शिलामय नितंब तट शोभती ।
पल्लवमय मृदु रक्त अंगुली वाऱ्यानें हलती ॥
पुष्पपरागसुगंधितसुविमलशीतलनिर्झरजलें ।
सेवितसे मज तेंवि तरुतलीं पसरुनि सुमधुर फलें ॥
छायाद्रुमतलिं नयनसुखातें सेविन आनंदें ।
[illegible]हातें प्रेरुनि रिझविल मज ही स्वच्छंदें ॥

म्हणुनी येथाचि चित्त रमो हें जेंवी निजमंदिरीं।
चकोर होउनियां या अटवीरमणी मुखचंदिरीं ॥
कृत्रिमता न च हिच्या विभ्रमीं मधुर गमे तो किती ?।
अभंग संगमसुख भोगिन मी इथेंच कीं संप्रति ॥
कठिनस्वान्ता गेली कान्ता सोडुनि मज भूवरी।
न च ही जाइल, ठेविल मजला स्वांकीं मेलों तरी ॥

१६४२ ... ... ...

—७०४—

## क्षुल्लक वस्तु.

( चाल—इस तन धन की० )

क्षुल्लक जगतीं कांहिं न पाहीं। दिसो तसें तें तैसें नाहीं॥ ध्रु० ॥
सान दिसति कण मातीचे परि संचित होतां शैलाचि होई ॥
एकेक क्षण अल्पाचि भासे बने क्षणांचें आयु सकलही ॥
बीज सान तरु थोर तयांतुनि निघे, नसे का ही नवलाई ? ॥

—७०५—

## कालकूटास.

### वृत्त—उपजाति.

या कालकूटा शिकलीस कोठें। कौशल्य ऐसें मज सांग मोठें।
नीचा पदा सोडुनि उच्च घेसी। क्रम क्रम उन्नति पावलेसी ॥
केलास पूर्वी हृदयांत वास। तूं अर्णवाच्या, त्यजुनी तयास।
कंठीं शिवाच्या मग पातलेसी आतां खळांच्या मुखिं राहिलेसी ॥

—७०६—

## कन्दुकास.

### वृत्त—साकी.

कुच हलती, कच विखुरति गालीं, कानिं कुंडलें डुलती।
हार गळयांतिल झोंके खाती डोळे गर गर फिरती ॥

घर्मजलाचे मुखकमलावरि बिन्दु कसे डवडवती, ।
उर धडधडतें बहुश्रमानें, श्वास अधिक बघ उठती ॥
ऐशी सुंदर बाला सादर मृदुल करानें तुजला ।
ताडी, उडवी, झेली वरि वरि, जन्म सफल तव झाला ॥

–७०७–

## तारा.

(फटका)

चमक चमक गे चटक चांदणी पसर आपुली नभीं द्युति ।
कोण असशि तूं म्हणुनि माझिया मनास वाटे नवल किती ? ॥
उंच उंच अति उंच जगाच्या फारचि वरतीं तूं वससी ।
दूर किती तरि आकाशामधिं हिऱ्यापरी गे लकलकसी ॥
सूर्य मावळुनि पार तयाचे किरण जगांतुनि जाति जंई ।
आकाशांतुन लुकलुक करिसी दाविसि अपुलें तेज तंई ॥
चमक चमक गे चमक रात्रभर पसर आपुली नभीं द्युति ।
कोण असशि तूं म्हणुनि माझिया मनास वाटे नवल किती ? ॥
मंद तेज जरि तुझें तरी त्या पाहुनि हरखति पांथतति ।
नसतिस जर तूं काळोखामधिं वाट तयांना कशि दिसती ? ॥
अशा रितीनें परोपकारा करिसि सदोदित कैंचि परी ।
कधिंहि भागसि न मंगलमूर्ते वानुं तुझे गुण किती तरी ॥
चमक चमक गे चमक रात्रभर पसर आपली नभीं द्युति ।
कोण असासि तूं म्हणुनि माझिया मनास वाटे नवल किती ? ॥

ग्रंथालय ठाणे
२०२४९

-७०८-

## समई.

(राग--धानी, त्रिताल.)

पद्य.

समइ दहा वातींची ही । बघ दिवसा जळते बाई ॥ ध्रु० ॥
भूमंडळिच्या सकळा स्नेहा शोषुनि ही घेई ॥
संतत वाहे गगनीं वारा परि न विझुनि जाई ॥
सकलमहीतें उंचावरुनी प्रकाश ही देई ॥
हिच्या प्रभावें अग्नी इंदुहि हतप्रभाचि होई ॥
माय जगाची तम नाशुनियां दुरित लया नेई ॥

-७०९-

## आशीर्वाद.

पद्य.

राग—हमीर, त्रिताल.

हो शिवद तुम्हां शिव तो । जो सकळांचें अशिव निरसुनि
नाम सार्थ करितो ॥ ध्रु० ॥
श्रुति वदुनि मुखीं श्रुतिसुख वितरी । कमलांकित उर कर
धारण करि । शिरिं वामांगीं हैमवती धरी । रूपत्रय वरितो ॥

-७१०-

## चित्तवानर.

पद्य.

वन फुललें वन फुललें । तारुण्यें मुसमुसलें । जणुं हें वन० ॥ध्रु०॥
घाली घान घाला तेणें इष्ट कार्य तें फसलें ॥

फांद्या पल्लव मोडी वेगें फलभक्षणिं हें रमलें ॥
शरीर सुंदर खुललें ऐसें मन आंतिल हें चळलें ॥
धर्मार्थांतें सोडुनि देई कामीं केवळ रमलें ॥
बांधुनि विवेकदोरी यातें स्थिरचि पाहिजे केलें ॥

-७११-

( राग--भैरव, त्रिताल. )

धरुनि मनिं भाविसुखाची आस ॥ ध्रु० ॥
गतदुःखातें विसरुनि जाऊं । निज तनु मन धन उद्यमिं लावूं ।
गणपतिचरणसरोजा ध्यावूं । सोडूं विघ्न भयास् ॥
विघ्न भयानें जे नर त्यजिती । स्वीकृतकार्या ते अति जडमति ।
त्यांवरि विघ्नविनायक गणपति । करि न कृपा हें खास् ॥

-७१२-

राग-खमाज ठुमरी

(चाल-छलबलन०)

मन बहुत घाबरे हरी रे । धांव धांव पावें झडकरिं ।
विषय प्रबल । मजसि सकल । करिति विकल ॥ आस्ताई ॥
धांव त्वरें हरि सोडविं मजला
नेइं जवळिं करिं जनु हें सफल ॥ १ ॥

-७१३-

राग-मुलतानी, त्रिताल.

( चाल-सुंदर सरजनुबा० )

चंदन तरु गुरु तो हो अमुचा । जो दावी पथ सोशिकतेचा ॥ध्रु०॥
निजांगभंजककुठारमुख ही । गन्धभरें करि सुरभित साचा ॥

-७१४-

( राग--असावरी, त्रिताल. )

### शिववन्दन.

वंदूं आद्य गुरू जगताचा ॥ ध्रु० ॥
श्रुतिपासुनि इतिहासावधि जें। वाङ्मय सारें जनक तयाचा ॥
निजनयनत्रयतेजें हरि जो। सकलतमा हर नामें साचा ॥
विस्मृतिरजनी तिमिरा भेदुनि। होवो दर्शक गतकालाचा ॥
मिथ्याग्रह जे अशिव निशाचर। शंकर करु संहार तयांचा ॥

-७१५-

### हो काय मनीं.

राग--दरबारी कानडा, त्रिताल.

अथवा

'सावळा सगुण जगजेठी ' ह्या स्त्रीगीताच्या चालीवर.

कां उभे राहिलां मौनी।
मन्मुखीं दृष्टि लावोनी। हो काय मनीं ? ॥
कां हसतां मधुनी मधुनी।
हसतां कां डोळां पाणी। हो काय मनीं ? ॥
कां जाणां आलों चुकुनी ?।
न च पुसतां मज लागोनी ?। हो काय मनीं ? ॥
कथिन न वा भलतें कथुनी।
फसविन कीं भय मन मानी। हो काय मनीं ? ॥
कां भलता ग्रह घ्या करुनी।
मन्मनास न च जाणोनी ?। हो काय मनीं ? ॥
हृदयांत वास दिनरजनी।
देहानें परक्यावाणी। हो काय मनीं ? ॥
कां फिरतां मन्मन हरुनी।
कां जातां मज सोडोनी। हो काय मनीं? ॥

-७१६-

## चोरीचा विनिमय.

राग-भीमपलास, त्रिताल.

त्वां माझें म्यां तुझें हि तैसें
अदय हृदय चोरिलें ।
आप आपल्या जवळि ठेविलें
हें कां झालें भलें ? ॥
जें दुसऱ्याचें तें न चोरणें
योग्य जरी आवडे ।
चोरीचा हा विनिमय रुचला
परि तुज मजही गडे ॥
तुवां चोरिलें तुझेंचि होवो
म्यां जें तें माझें ।
जेथ ठेविलें राहु निरंतर
न गमो हें ओझें ॥
तूं झालिस मी मी तूं झालों
द्वैतचि मावळलें ।
कुणी कुणाचें कधीं कसें गे
काय गडे चोरिलें ? ॥

-७१७-

## स्वधर्मनिष्ठा.

( राग—बिहाग, त्रिताल )

अथवा

'पश्यति दिशि दिशि' ह्या अष्टपदीच्या चालीवर.

मृदुभाषिणि वद अशी न वाणी । न च निर्दय मनिं मजला मानीं ।
कोप असा । कां मजवरि करिसी सहसा ? ॥धृ०॥

वरितों निश्चित रणभूमीतें । सोडिनियां तुज मनरमणीतें ॥
हृदय पूत तव मानस शांत । सोडुनि जातों वदन सुवृत्त ॥
जाउनि घोररणीं सावेग । दारुणरिपुचा करितों संग ॥
तव भुजवलया निर्वृतिनिलया । निजकंठींच्या शिथिल करुनियां ॥
करधृतखड्गें गे आलिंगन । खलरिपुकंठा सत्वर देइन ॥
मंचकपृष्ठावरुनि उतरतों । हा बघ घोड्यावरतीं चढतों ॥
मऊ पांघरुण टाकुन देतों । चिलखत रणहित गे पांघरतों ॥
तुज ठायीं स्थिर मम अनुराग । मानुं नको गे यासि विराग ॥
क्षात्र धर्म तो प्रेरी मजला । विषम रणांगणिं अजि जायाला ॥
वाखाणशील तूं ही रमणी । सुविचारांतीं माझी करणी ॥
स्वधर्मनिष्ठा असि न वसे जर । मानधनाच्या मम हृदयीं तर ॥
कशास तुजवरि माझी प्रीती? । तुझिही मजवरि कशास भक्ति? ॥

---

-७१८-

## मनस्विमनीषित.

——:o:——

### अभंग

भक्तकामकल्पद्रुम । माझा पुरवो हा काम ।
मागें जोडोनियां कर । त्याहुनि न देवो पर ॥
'याजपाशीं नाहीं धन'। ऐसें म्हणोनियां जन ।
न करुत कोणी फार । जगीं माझा तिरस्कार ॥
'माजला हा बहु धनें'। ऐशा निंदोनी वचनें ।
मनीं मत्सरासी ठावो । कोणी कधिंही न देवो ॥
थोर कृत्याहुनि भलें । सदा वाटो दे चांगलें;
तेणें मान्यता ये सान । ते ही थोर मानो मन ॥

बरी नोहे जगीं कीर्ती । नको परी ती अकीर्ती ।
जन दुष्कृतातें स्मरे । सर्व सुकृत विसरे ॥
पारखोनी शीलवंत । धरीं थोड्यांची संगत ।
ठावें नाहीं शील ऐसे । वोळखीचे मात्र खासे ॥
घडो त्यांची न संगति । होवो जन्माची न माती ।
शास्त्राभ्यासीं जावो दिस । लागो वृत्तीचा न ध्यास ॥
गाढनिद्रे जावो निशी । जाग हेतू उद्वेगासी ।
मिळो रहाया खोपट । नको बंगला चोखट ॥
उपयोगातें पाहणें । नको भोग ते भोगणें ।
निसर्गाचि रम्य वन । तेथें रमो माझें मन ॥
बाग मनुष्याची कृति । न जडो हे तेथ मति ।
हेंचि सुख हेचि सोय । हाचि आरामा उपाय ॥
जगलिया ऐशा रिती । स्वर्गी कल्याणाची प्राप्ति ।
ऐसें जगीं या वागेन । तरी चिरायु होईन ॥
वय सत्कर्मे घालवी । तो तें निश्चित वाढवी ।
ऐशा योगें कैचें भय । फळ अपेक्षावें काय ? ॥
करणें तें केलें हेचि । मति खाण आनंदाची ।

---

-७१९-

## प्रार्थनाष्टक.

——:o:——

भुजगप्रयात

थवेच्या थवे लाविल्यानें दिव्यांचे ।
कसें काज कीजेरवीच्या करांचें ? ॥
दवाचे बहू वर्षतां सान्द्र बिन्दु ।
भरोनीं कधीं जाय का सांग सिन्धु ? ॥ १ ॥

स्तवोक्ती कवींच्या किती ही असोत ।
तयां त्वद्यशाचा न लागले अंत ॥
मला तों नसे बुद्धि काव्या कराया ।
तरी चापलें मी सजें देवराया ॥ २ ॥
तुझी मूर्ति पाहावया नेत्रभाव ।
रमाया कथाकर्णनीं कर्णभाव ॥
यशोवर्णनीं अन्य वाणीपणातें ।
मदीयेन्द्रियें वांछिती पावण्यातें ॥ ३ ॥
नको छत्र मातें, नको चामरें तीं ।
गमे तुच्छ ती भूपतींची विभूति ॥
तनू वल्कलें वेष्टुनी वास रानीं ।
घडे भक्ति तैं मुक्तिही हीन मानीं ॥ ४ ॥
न बीजाविणें वृक्ष जन्मास येई ।
न वृक्षाविणें बीजनिष्पत्ति होई ॥
न हो भक्तिवांचोनियां त्वत्कृपा ती ।
कृपे वांचुनी ना घडे तेंवि भक्ति ॥ ५ ॥
भवीं या बहू भाव आहेत रम्य ।
तयांतील जाणोनियां तारतम्य ॥
स्तवोक्ती तुझी एक भक्ती दुजी ती ।
प्रभो आवडी सेवितों दीसरातीं ॥ ६ ॥
अधिष्ठान चित्तीं तुवां केलियास ।
भवोर्मी शके क्षोभवाया न त्यास ॥
मृगेन्द्रें स्वतां राखिलीया वनान्तीं ।
मदोन्मत्तही वावरे काय हत्ती ? ॥ ७ ॥
किती निन्दिले वन्दिले शत्रु मित्र ? ।
किती साहिले बोल लोकीं विचित्र ॥
कितीकां सवें भांडलों वृत्तिपायीं ।
पुरें हें प्रभो देइं तूं ठाव पायीं ॥ ८ ॥

-७२०-

## चित्ताची चाळण.

——:०:——

राग–भूप, झपताल.

पद्य.

तूझिया चिंतनीं
जाहलें चाळणी
चित्त माझें झणीं
अष्टमूर्ते ॥ १ ॥

इन्दुची वक्रता
नेत्रिची उष्णता
कंठिची कृष्णता
लाभलीसे ॥ २ ॥

कांति ना लाभली
ना सुधा पावली
इंदुची राहिली
त्याजपाशीं ॥ ३ ॥

नेत्रिचें तेज तें
राहिलें मागुतें
अंधकारीं रुते
दास तूझा ॥ ४ ॥

कां न गंभीरता
कंठिची तत्वतां
ओपुनी तारितां
दीन दासा ॥ ५ ॥

-७२१-

## पूर्णेन्दुसमा.

——:O:——

पद्य

तूं दिनावसानीं येसी । हा ! निशावसानीं जासी
पूर्णेन्दुपरी मज गमसी । गे हृदयवल्लभे रमणी ॥
सकलही तमातें हरिसी । नयनांतें आनंदविसी ।
पूर्णेन्दुपरी मज गमसी । गे मदनमंजरी रमणी ॥
तूं दिव्यसुधेची सरसी । तूं चित्ताकर्षण करिसी ।
पूर्णेन्दुपरी मज गमसी । गे बहुविधविलासराशी ॥
रमणीय कलांची खाणी । तूं खरी कलानिधिवाणी
न च रामा तुजसम कोणी । सकलांची तूंचि शिराणी ।
अनुपम स्पर्शसुख देसी । कामना सकल पुरवीसी ॥
पूर्णेन्दुपरी मज गमसी । गे रामे सुकुमारांगी ॥
मलयजरस ओतिसि अंगीं । वाटे कीं निजांगसंगीं ।
गुरुतरतनुतापविभंगीं । पूर्णेन्दुपरी मज गमसी ॥
अति सौम्य तुझा आकार ! तूं असती परमोदार ॥
तूं संसाराचें सार । पूर्णेन्दुपरी मज गमसी ॥

-७२२-

## गुणवतीनिधन.

—:o:—

( राग-मालकंस, त्रिताल.

थोर कुळांमाधिं जन्मुनियां । सुन्दरतर वपु लाधुनियां ॥
सकलगुणान्वित होउनियां । शीलहि उत्तम पावुनियां ॥
व्यर्थ शीणलिम्प गे सखये । कीं एकहि कामास न ये ॥

जवाळीं असावें तें असुनी । अंतकाळीं न च शरण कुणी ॥
न शिवे निद्रा निशि नयना । अश्रुविमोचन सुखवि मना ॥
वदनशशी तव मावळला । आशातंतु पुरा तुटला ॥
म्हणुनी स्मृतिसुख अनुभवुनी । निःश्वासीं कंठिन रजनीं ॥

---

-७२३-

## ईश्वरी योजना.

### दिंडी.

बाळ गेला बागेंत खेळण्याला ।
गुलाबाचें रोपडें दिसे त्याला ॥
ओरबाडुनि त्या वरिल फूल तोडी ।
करीं कांटे रुततांचि झाड सोडी ॥ १ ॥
पुढें जातां देखिलें मोहळास ।
तया आंतिल मध इच्छि चाखण्यास ॥
म्हणुनि जाउनि त्याजवळ करें ओढी ।
तोंचि माशी डसुनियां गांध काढी ॥ २ ॥
घरीं आला मग रडत पित्यापाशीं ।
वृत्त तेणें कथियलें सर्व त्यासी ॥
पुसुनि असवें कुरवाळि पिता त्याला ।
प्रश्न ऐसा बालकें तया केला ॥ ३ ॥
असति कांटे कासया गुलाबाला ।
काज त्यांचें काय हो असे त्याला ॥
तेंवि मधमाशा बसति चावण्यासी ।
मोहळाच्यावर उगिच कां जनांसी ? ॥ ४ ॥
तात बोले बालका स्निग्धवाणी ।

ईश्वराची योजना मनीं आणी ॥
वस्तु सुंदर जी मधुर असे तीतें ।
जपुनि वापरणें, दुःख अन्यथा तें ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाड्या शाखा.
क्र.
देण्याचा
तारीख,

## प्रियेस.

—:०:—

( राग—छायानट, त्रिताल )

तुझिया कानीं कुंडल होइन । तेथ सदोदित हालत राहिन ।
कपोलसंगसुखातें सेविन । धन्य जगीं जनु अपुलें मानिन ॥
कटितटिं किंवा होइन कांची । जागा मिळविन बहुत सुखाची ।
धरिन सांवरुनि तव हृदयातें । धड धड करुनि न देइन त्यातें ॥
अथवा कंठीं होउनि हार । राहिन दिनरजनीं साचार ।
वक्षःस्थल हलतां त्या संगें । जाइन खालीं वरतीं अंगें ॥
कंठांतुनिया काढायातें । इच्छिशील तूं कधिंहि न मातें ।
अद्भुत लाघव माझें बघशिल । सुखेंचि मजला हृदयिं वाहशिल ।
नूपुर होउनि चरणा सेविन । मधुररवानें गीतें गाइन ।
अथवा नथींत मोतीं होइन । अधरपुटीं तव लटकुनि राहिन ॥
मृतप्राशन करुनी तेथिल । क्षयज भयातें हा जन वारिल ।
कशापरीही दे मज थारा । उपाय जगण्या नाहीं न्यारा ॥

सार्वजनिक वाचनालय

-७२५-

## स्वप्न.

चाल-कटावाची.

स्वप्नींची मात । ऐका देउनियां चित्त ॥ ध्रु० ॥
अवनीपति कुणि अपुल्या भवनीं । सुखें पहुडला असतां शयनीं ॥
स्वप्निं तीन त्या मूषक दिसले । शय्येजवळीं होते बसले ॥
पुष्ट एक बहु कृशांग दुसरा । ठार आंधळा होता तिसरा ॥
राजा दचकुनि जागा झाला । अशुभ वाटलें स्वप्न तयाला ॥
झणिं पाचारी शाकुनिकाला । तया विचारी स्वप्नार्थाला ॥
धूर्त शाकुनिक तयास वदला । स्वप्न असें सुचवी अपुणाला ॥
पुष्ट एक जो मूषक दिसला । आपुलाचि तो सचिव पोसला ॥
दुजा क्षीण जो असे पाहिला । प्रजाजनचि तो साच वाळला
अंध तिचा जो जवळि बैसला । तुझिया दावी स्वयें स्थितीला ॥

---

-७२६-

## प्रियादर्शन.

( पद्य. चाल-तेथेंच उभी इ० )

तव दर्शन मजला सुखवी । कीं वदूं काय गे भिववी ॥ सुंदरी० ॥
अति कोमल कंठमृणाल । वरि शोभे हें मुखकमल ॥ सुं० ॥
किति नाजुक तुझिया गालीं । हीं गुलाब पुष्पें फुललीं ॥ सुं० ॥
नव पल्लव ओंठावरतीं । मृदुलतिके तुझिया खुलती ॥ सुं० ॥
गरगरा फिरविसी डोळे । तेजाचे गमती गोळे ॥ सु० ॥
त्यांतुनी उडत जी ठिणगी । हन्मंदिरिं लावी आगी ॥ सुं० ॥
शिरिं धरिसि सर्पशिशु काळे । बहु घातुक त्यांचे चाळे ॥ सुं०॥

जे फेंकिसि कटाक्ष बाण । ते व्याकुळ करिती प्राण ॥ सुं०॥
पार भय मज न च मरणाचें । दे प्राशन अधर सुधेचें ॥ सुं० ॥

-७२७-

## नीज आतां तान्हुल्या.

वृत्त-दिंडी.

धन्य बाळा! पाळणा हा विशाल ।
तुला सांप्रत वाटतो, निज खुशाल ॥
प्रौढपणिं परि निःसीम मही सारी ।
खचित ही तूं गणिशील सान भारी ॥ १ ॥
तुझ्या आकांक्षा फार वाढतील ।
नित्य नूतन तूं वस्तु पाहशील ॥
वृथा त्यांची धरिशील हांव पोटीं ।
अहह! वाटे काळजी मला मोठी ॥ २ ॥
व्याप तितुका संताप ह्या ह्मणीचा ।
तुला अनुभव येईल जाण साचा ॥
झोंप कोठुनि ती स्वस्थ लागणार ? ।
नीज आतां तान्हुल्या हेंचि सार ॥ ३ ॥
तुला निजवाया गीत आज गातें ।
पुढें रडगाणें ऐकणेंचि तूतें ॥
जागुनीयां दिनरजनि कंठिशील ।
तदा माझ्या अठवणी काढिशील ॥ ४ ॥
नको फोडूं तान्हुल्या असा टाहो ।
नीज आतां तुज दुःख कोणतें हो ? ॥
दुःख पुढतीं येणार ह्मणुनि काय ।
हाय! रडशी बा मोकलोनि धाय ॥ ५ ॥
भावि काळाची परि न कल्पना ही ।

तुझ्या चित्ता शिवणंहि शक्य नाहीं ।
असें असतां कासया रडें येई ? ।
गीत गातें मी सुखें झोंप घेई ॥ ६ ॥

-७२८-

## खोटेपणाची ऐट.

राग-मांड, केरवा.

अ—

आजवरी
कधिंहि खरी
बोललों न मी वैखरी ॥

ब—

अशि होता
तव कीर्ती
हाय ! लोपविलि अजि तूं ती ॥

अ—

वदसि असें
गड्या कसें
काय लागलें तुला पिसें ॥

ब—

जी कबुली
तुवां दिली
सत्योक्ती ही तव पाहिली ॥
मी खोटा
हा पेटा
जिरला दावुं नको ताठा ॥

-७२९-

## पुष्पपारिमल.

—:०:—

आर्या.

दिससी सुंदर सुमना सुमनोहर रुचिरवर्ण आजि किती ? ।
कालेंकरुनि दलें तव कोमल गळतील हाय ! भूवरतीं ॥ १ ॥
गळतिल गळोत तीं वा वर्ण विकृत होउ पावु तनु विलया ।
लोकंपृण तव परिमल जन्म सफल करिसि त्यास पावुनियां ॥ २ ॥
रूप मनोरम तुझिया सम मनुजाचें तसेंच गुण अन्य ।
कालें लोपुनि जाती ज्याचें यश शेष राहि तो धन्य ॥ ३ ॥

---

-७३०-

## दशाविनिमय.

—:०:—

वसंततिलका.

शेतें कितीक तुझिया तरि मालकीचीं ?
माझी जमीन न च पांडहि एक साची ॥
तूं राहसी रुचिर भव्य अशा गृहांत
मी मोडक्या वसतसें परि झोंपडींत ॥ १ ॥
संपत्ति थोर वडिलार्जित पावलासी
ये माझिया न कवडीहि परी करासी ॥
ऐसें असोनि दिससी मज दीनवाणा
मी तों असें स्वगृहिंचा जणु धन्य राणा ॥ २ ॥
बागा तुझ्या असति रम्य किती विशाल ?
रानावनांत फिरतों बघ मी खुशाल ॥

तीं देखुनी सुख मिळे मम डोळियांस
त्याचा शतांशहि तुला मिळतो न खास ॥ ३
निद्रादिदोष जडले तुझिया शरीरा
उत्साह आणि बळ ह्यां मम देह थारा ॥
लेसी सदैव बहुमूल्य दुकूल हार
मी तों कुचेल तुजहूनि सतेज फार ॥ ४ ॥
संपत्तिचाच बनलासि सदैव दास
दापील कोण मजला वद मालकास? ॥
सेवेस तत्पर तुझ्या किति वैद्य रोज?
माझ्याकडे कुणिहि ये न, मला न काज ॥ ५ ॥
वित्ताढ्य तूं निशिदिनीं असती सचिंत
निर्भीक चित्त मम नित्य नितान्त शान्त ॥
येवो कधींहि यमराट् मज न्यावयाला
आहें तयारचि तयासह जावयाला ॥ ६ ॥
पाहोनि सृष्टिरमणी रमसी मनीं ना
साधी लताहि सुखवी मम लोचनांना ॥
तूं मानिसी रुत कठोर विहंगमांचें
मातें रुचे मधुर-गायन-तुल्य साचें ॥ ७ ॥
देखोनिया जरि दशा सुसमृद्ध मातें
रे मागशील मम दुःस्थिति आपणातें ॥
होईन या विनिमया करण्या न राजी
राहो तुझी तुज दशा मजलाहि माझी ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
ग्रंथालय शाखा.
अ. क्र. १६३५८
विभाग म/५५
क्रमांक, २
२०. ४-५८

REFBK-0020249

REFBK-0020249